POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६२ ● मुंबई, मंगळवार, १३ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मतदान करा, सवलत मिळवा!

## मतदान जनजागृतीसाठी आहार संघटनेचा पुढाकार

■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढीसाठी पालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. महाराष्ट्रातील संघटना इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (आहार) यांनीही मतदार जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून या दिवशी मतदान केलेल्या मतदारांना आहार संघटनेशी संलग्न असलेल्या रेस्टॉरंट, हॉटेलमध्ये विशिष्ट सवलत देण्यात येणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवार, १५ जानेवारीला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांच्या नेतृत्वाखाली आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वीप' उपक्रम राबविण्यात येत आहे. महानगरपालिकेचे सह आयुक्त (कर निर्धारण व संकलन/ निवडणूक) विश्वास शंकरवार, सहायक आयुक्त (करनिर्धारण व संकलन) डॉ. गजानन बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार महापालिकेमार्फत सर्वसमावेशक व बहुआयामी मतदार जागृती अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत पथनाट्यांचे आयोजन, मतदार जनजागृती फेरी, प्रभात फेरी, शाळाझ्रमहाविद्यालयांमधील उपक्रम, विद्यार्थ्यांकडून त्यांच्या पालकांसाठी मतदान संकल्पपत्र भरून घेणे, विविध सामाजिक व शैक्षणिक माध्यमांतून मतदानाचे महत्त्व अधोरेखित केले जात आहे.



### सकारात्मक वातावरण निर्मितीसाठी सहभाग

आहार संघटनेने महानगरपालिका व निवडणूक प्रशासनाच्या सहकार्यार्ने मतदार जनजागृती मोहिमेत सहभागी होण्याची तयारी दर्शविली आहे. हॉटेल व रेस्टॉरंट क्षेत्राचा सार्वजनिक संपर्क लक्षात घेता, नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी हा सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे आहार संघटनेचे अध्यक्ष विजय शेट्टी यांनी सांगितले. आहार ही संस्था महाराष्ट्रातील ८,००० हॉटेल्स, रेस्टॉरंट्स व परमिट रूम्सचे प्रतिनिधित्व करत असून, राज्यभरातील ६५ जिल्हा संघटनांशी संलग्न आहे. मतदान हा लोकशाहीचा कणा असून, ह्लमी समाजाचा एक जबाबदार घटक आहेह्व ही भावना नागरिकांमध्ये निर्माण करून, मतदानाद्वारे कर्तव्ये पूर्ण करणे हा या सर्व उपक्रमांचा केंद्रबिंदू आहे. मतदार सहभाग वाढविण्यासाठी प्रशासन, विविध शासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था व व्यावसायिक संघटना एकत्रितपणे कार्यरत असल्याचे सकारात्मक चित्र या माध्यमातून समोर येत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्यामार्फत वाहनचालकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात येत असून, ह्यफ्लॅशमॉबह्व व इतर दृकश्राव्य माध्यमांच्या सहाय्याने मतदानाचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात येत आहे. डिजिटल युगाचा विचार करता, समाज माध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सवरही मतदार जनजागृती मोहीम सुरू आहे.




### या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई

कारवाईत पालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह राष्ट्रीय बँक, बेस्ट, बीएसएनएल, एचपीसीएल, विमा कंपनी, एलआयसी, म्हाडा, एमटीएनएल, टपाल खाते, रेल्वे, आरसीएफ, नाबार्ड या शासकीय/ निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम आदींतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

### ...म्हणून कारवाईचा बडगा उगारला

महापालिका निवडणुकीत १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ इतकी मतदारांची संख्या आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. १५ जानेवारी रोजी मतदान तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची कमतरता प्रशासनाला दिसून येत आहे.

### निवडणूक प्रक्रियेत गैरहजरी महागात... साडेसहा हजारांहून अधिक अधिकारी, कर्मचाऱ्यांना नोटीस

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेत गैरहजर राहणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना महागात पडले. गैरहजर राहणाऱ्या एकूण ६ हजार ८७१ अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. पैकी २ हजार ३५० अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. वारंवार सूचना देऊनही प्रशिक्षण, प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया अथवा नेमून दिलेल्या निवडणूक कर्तव्यास हजर न राहणाऱ्या ४ हजार ५२१ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सोमवारपासून पोलीस कारवाई केली जाणार आहे. मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्या निर्देशांनुसार कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महानगरपालिका मुख्यालयात रविवारी पार पडलेल्या या बैठकीस सहआयुक्त (करनिर्धारण व संकलन) विश्वास शंकरवार, उपायुक्त (सामान्य प्रशासन) किशोर गांधी, सहायक आयुक्त (करनिर्धारण व संकलन) गजानन बेल्लाळे यांच्यासह परिमंडळ उपायुक्त, सर्व प्रशासकीय विभागांचे सहायक आयुक्त उपस्थित होते. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांचे मतदान प्रक्रियेविषयीचे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक होते. मात्र जे अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण सत्रास गैरहजर राहिले आहेत, त्यांना १० जानेवारी रोजी अंतिम संधी देण्यात आली होती. निवडणूक प्रक्रियेत अनुपस्थित राहणाऱ्या किंवा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांविरुद्ध रविवारपासून निवडणूक कायद्यांतर्गत कडक शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिला होता. त्यानुसार कारवाईस करण्यात आली आहे.

## मिरा-भाईंदर पालिकेची लक्तरे वेशीवर

## मुख्यालयात अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार, काय घडलं?

■मिरा-भाईंदर। प्रतिनिधी,

संपूर्ण मिरा-भाईंदर शहराचा कारभार चालत असलेल्या महापालिका मुख्यालयात एका अल्पवयीन कंत्राटी कर्मचारी मुलीवर दुसऱ्या स्थायी कर्मचाऱ्याने अत्याचार केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार बाहेर येऊ नये ,यासाठी विशेष खबरदारी प्रशासकीय यंत्रणांकडून घेण्यात असल्याचे पहायला मिळत आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेचे भाईंदर पश्चिमेला मुख्यालय आहे. या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर असणाऱ्या आयुक्त दालनासमोर उपमहापौर दालनात पालिका निवडणुकांच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात मनुष्यबळ विभाग तयार करण्यात आला आहे. येथे कंत्राटी पद्धतीने काम करत असलेली १७ वर्षीय पीडिता झेरॉक्स काढणे व इतर काम पाहत असल्याचे समजते.

तिला येथील स्टोर रूम मध्ये फाईल आणण्यास २७ वर्षीय स्थायी कर्मचारी असणाऱ्या सागर किणी ने सांगितले. नंतर ती स्टोर रूम मध्ये गेल्यावर तिच्या मागून जाऊन किणीने तिच्यावर तेथे



बळजबरीने अत्याचार केला. तत्पूर्वी २७ डिसेंबर ला किणी ने पीडीतेला घरी निवडणुकीची महत्त्वाची फाईल घेण्यासाठी गीता नगर येथील घरी बोलवले होते. यावेळी देखील त्याने पीडितेवर अत्याचार केला होता.

या प्रकरणाची पिडीतील तक्रार दाखल केल्यानंतर किणी विरोधात पोलिसांनी बाल लैगिक अत्याचार कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याला आठवडा झाला असला तरी परराज्यात जाऊन अमली पदार्थ विरोधात व इतर प्रकरणात कारवाई करणाऱ्या स्थानिक पोलिसांना मात्र हा आरोपी हाती लागलेला नाही.त्यामुळे पोलिसांच्या भुमिकेवर ही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यावर आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती भाईंदर पोलिसांनी दिली.

### मिरा-भाईंदर महापालिका अधिकाऱ्यांची बेजबाबदारी

मिरा-भाईंदर पालिकेने निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने झेरॉक्स काढण्यासाठी एका कंपनीला कंत्राट दिले असल्याचे कळते. या कंत्रादाराने पीडित तरुणीला मुख्यालयात काम करण्यास सांगितले होते. म्हणजेच संबंधित पीडित तरुणी ही कंत्राटी कर्मचारी ठरते. तिची माहिती पालिका अधिकाऱ्यांकडून नियमानुसार घेतली जाणे अपेक्षित होते. मात्र,त्याकडे त्यांच्याकडून दुर्लक्ष करण्यात आल्याने ती अल्पवयीन असताना ही अनेक दिवसांपासून काम करत होती. यातून पालिका अधिकाऱ्यांची बेजबाबदारी देखील समोर येत आहे.गुन्हा दाखल करताना पीडित महापालिका काम करत होती,असे हे नमूद करण्यात आलेले नाही. त्यामागे निवडणूक काळात महापालिका अधिकाऱ्यांच्या अडचणी वाढू नये, हे कारण असल्याचे बोलले जात आहे.यामुळे जबाबदार अधिकाऱ्यांवर देखील कारवाईची मागणी होत आहे.

## दहावी-बारावीच्या परीक्षांच्या महिनाभरआधी नवा वाद

## परीक्षा केंद्रांनी बोर्डाकडे केली 'अशी' मागणी

### निर्णयाअभावी संभ्रमाची स्थिती

या संदर्भात शालेय शिक्षण मंत्री, शिक्षण विभाग आणि परीक्षा मंडळ यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र, अद्याप कोणताही ठोस निर्णय किंवा निधीबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही. ऐन परीक्षेच्या तोंडावर हा विषय प्रलंबित राहिल्याने शाळा व्यवस्थापनांमध्ये संभ्रम कायम आहे. महामुंबई शिक्षण संस्था संघटनेने स्पष्टपणे सांगितले आहे की, सीसीटीव्ही व्यवस्था सक्तीची असेल तर त्यासाठी स्वतंत्र निधी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. निधी उपलब्ध न झाल्यास परीक्षा केंद्र चालवणे शक्य नसल्याचा निर्धार बैठकीत नोंदवण्यात आला आहे. आता शासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या शालांत परीक्षांसाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, या निर्णयासाठी कोणताही निधी उपलब्ध करून दिलेला नसल्याने शिक्षण संस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासनाने थेट जबाबदारी शाळा व्यवस्थापनांवर टाकल्याचा आरोप शिक्षण क्षेत्रातून केला जात आहे.

महामुंबई शिक्षण संस्था संघटनेने या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. संघटनेचा स्पष्ट इशारा आहे की, निधी मिळाल्याशिवाय सीसीटीव्ही बसवणे शक्य नाही. त्यामुळे गरज पडल्यास परीक्षा केंद्र रद्द करणेही स्वीकारावे लागेल. या भूमिकेमुळे




शिक्षण विभाग आणि शासनावर दबाव वाढला आहे.

### पूर्वतयारी बैठकीत मुद्दा ठळकपणे मांडला

संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय पूर्वतयारी बैठकीत हा विषय गांभीयार्ने मांडण्यात आला. शालांत परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना करण्यास संस्थांचा विरोध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, कोणतीही आर्थिक तरतूद न करता खर्चिक यंत्रणा बसवण्याची सक्ती करणे अन्यायकारक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

### सीसीटीव्ही व्यवस्थेचा वाढता आर्थिक भार

सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, त्यांची देखभाल, डेटा स्टोरेज, तांत्रिक प्रणाली आणि मनुष्यबळ यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो. अनेक खासगी आणि अनुदानित शाळांकडे इतका निधी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अचानक ही जबाबदारी टाकणे शाळांसाठी अडचणीचे ठरत आहे.

बैठकीत हेही नमूद करण्यात आले की, अनेक शासकीय शाळा आणि कार्यालयांमध्ये अद्याप सीसीटीव्हीची पूर्ण व्यवस्था नाही. असे असताना खासगी व अनुदानित शाळांवर ही सक्ती लादणे म्हणजे शासनाने स्वतःची जबाबदारी टाळल्यासारखे आहे, अशी भावना शिक्षण संस्थांनी व्यक्त केली.

## लाल कापड, त्यावर नारळ, लिंबू, सुपारी अन्...

## नेरळच्या प्रसिद्ध तलाव परिसरात अघोरी प्रकार, परिसरात दहशत

■रायगड। प्रतिनिधी,

नेरळ गावातील नागरिकांसाठी एकमेव आणि महत्त्वाचे मनोरंजनाचे ठिकाण असलेल्या राजमाता जिजामाता तलाव परिसरात अघोरी विद्येचा संशयास्पद प्रकार उघडकीस आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. सार्वजनिक व कायम वर्दळीच्या ठिकाणी अशा प्रकारचे कृत्य घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून तीव्र संतापही व्यक्त केला जात आहे.

### रात्री तलाव परिसर बंद असताना घडली घटना

ही घटना १० जानेवारीच्या रात्री घडल्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी तलाव परिसर बंद असतो, असे असतानाही अघोरी कृत्य कसे करण्यात आले. याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. परिसरात कुंपण, प्रवेशद्वार, पथदिवे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले असतानाही हा प्रकार घडल्याने सुरक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



**मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांनी दिसलं भयंकर दृष्य**

११ जानेवारी रोजी पहाटे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना ओपन जिमजवळील मोकळ्या जागेत लाल कापड, त्यावर ठेवलेले अनेक नारळ, लिंबू, सुपारी व नागवेलाची पाने आढळून आली. एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात नारळ व पूजा साहित्य आढळल्याने हा प्रकार अघोरी विद्येसाठीच करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं

राजमाता जिजामाता तलाव परिसरात चालण्यासाठी ट्रॅक, ओपन जिम आणि ज्येष्ठ नागरिक कट्टा असल्याने सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे अशा ठिकाणी अघोरी प्रकार झाल्याने महिलांमध्ये व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरु

या घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. कुंपणावरून प्रवेश करण्यात आला असावा, अशी शक्यता वर्तवली जात असून, सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. सार्वजनिक ठिकाणी अशा अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या कृत्यांवर प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या बंगल्याबाहेर बेवारस बॅग

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थानाबाहेर रविवारी एक बेवारस बॅग आढळून आल्याने खळबळ उडाली. या घटनेमुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून, बॉम्ब शोधक पथकाकडून बॅगची सखोल तपासणी करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक तरुण ही बॅग ठेवून जाताना दिसत असल्याने पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली.



घटनेच्या तपशीलानुसार, नितेश राणे यांचे मुंबईतील शासकीय निवासस्थान 'सुवर्णगड'बाहेर ही काळ्या रंगाची ट्रॉली बॅग रविवारी सकाळी आढळून आली. बेवारस बॅग सापडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आणि संपूर्ण क्षेत्र सील करण्यात आले. घटनास्थळी येण्या-जाण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली. बॉम्ब शोधक पथक आणि श्वान पथकाच्या मदतीने बॅगची तपासणी करण्यात आली. प्राथमिक तपासणीत बॅगमध्ये कुठलीही संशयास्पद वस्तू आढळली नाही, मात्र सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी सावधगिरी बाळगली.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये या घटनेचे स्पष्ट चित्रण समोर आले आहे. फुटेजनुसार, करड्या रंगाचा टी-शर्ट, काळ्या रंगाचे जॅकेट आणि पँट घातलेला एक तरुण हातात ब्लॅक ट्रॉली बॅग घेऊन नितेश राणे यांच्या बंगल्याजवळ येतो. तो तेथे बॅग ठेवून लगेच निघून जातो. या तरुणाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी सुरू केली आहे. हा तरुण कोण आहे, त्याने ही बॅग का ठेवली आणि त्यामागे काही उद्देश आहे का, याची चौकशी करण्यात येत आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या तरुणाचा शोध घेण्यासाठी आसपासच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहे. तसेच, त्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी तांत्रिक मदत घेण्यात येत आहे. बॅगची तपासणी केल्यानंतर त्यात एक चिठ्ठी आणि काही वस्तू आढळल्या. त्यात एक चिठ्ठी देखील आढळून आली असून, ह्यया बॅगमध्ये बूट आणि कपडे आहेत. ते तुम्ही मोफत घेऊ शकता,ह्व असा मजकूर लिहिलेला आहे. बॅग ठेवायच्या भानगडीत पडू नये, अन्याथा अशा ठिकाणी बॅग ठेवीन की उरले सुरले संपून जाईल असा इशाराही नितेश राणे यांनी दिला.

## डोंबिवलीत भाजपकडून पैशांची पाकिटे वाटल्याचा आरोप

■डोंबिवली। प्रतिनिधी,

राज्यात जास्तीत जास्त 'बिनविरोध' नगरसेवक निवडून आणण्याऱ्या डोंबिवलीत निवडणुकीपूर्वी भाजपकडून पैशांची पाकिटे वाटली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. डोंबिवलीच्या तुकाराम नगर परिसरातील दशरथ भुवन भागात भाजपकडून नागरिकांच्या घरी तीन हजार रुपयांची पाकिटे वाटली जात असल्याची चर्चा आहे.

शिवसेनेचे उमेदवार नितीन पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी पैसे वाटणाऱ्या व्यक्तींना 'रंगेहाथ' पकडल्याचा दावा केला आहे. नागरिकांना पैसे वाटप होत असल्याची माहिती मिळताच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी संबंधित ठिकाणी धाव घेतली आणि प्रकार उघडकीस आणला. या घटनेनंतर निवडणूक



आयोगाचे पथक आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू असून, पैशांचे वाटप नेमके कोणी आणि कुणाच्या सांगण्यावरून केले, याचा तपास केला जात आहे. निवडणूक आचारसंहितेच्या उल्लंघनाचा गंभीर आरोप भाजपवर होत आहे.



## चंद्रभागा नदीच्या पुलावर भीषण अपघात, ट्रॅक्टर अन् कंटेनर खाली कोसळला, २ जणांचा मृत्यू तर ८ जखमी

■पंढरपूर। प्रतिनिधी,

पंढरपूर शहरातील चंद्रभागा नदीवरील आहिल्या पुलावर रविवारी (दि.११ जानेवारी) रात्री भीषण अपघात घडला. ट्रॅक्टर आणि कंटेनरचा ताबा सुटल्याने दोन्ही वाहने थेट पुलावरून खाली कोसळली. या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींमध्ये दोन लहान मुलांचाही समावेश आहे. या घटनेमुळे संपूर्ण पंढरपूर शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यातील करकंब येथील ऊसतोड कामगारांची टोळी कर्नाटकातून ऊसतोडीचे काम आटोपून ट्रॅक्टरमधून आपल्या मूळ गावी परतत होती. रात्री साडेआठच्या सुमारास ही टोळी पंढरपूर शहरातून चंद्रभागा नदी ओलांडत असताना आहिल्या पुलावर आली. याच वेळी समोरून जाणाऱ्या कंटेनरचा आणि ट्रॅक्टरचा ताबा अचानक सुटला आणि दोन्ही वाहने थेट पुलावरून खाली कोसळली.

या अपघातात ट्रॅक्टरमध्ये प्रवास करणाऱ्या ऊसतोड टोळीतील तब्बल नऊ जण आणि कंटेनरमधील दोन जण असे एकूण अकरा जण पुलाखाली कोसळले. या भीषण दुर्घटनेत महादेव दिलीप काळे आणि राजू रमेश चव्हाण यांचा मृत्यू झाला आहे. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. पुलावरून खाली कोसळलेल्या वाहनांमुळे आणि जखमींच्या आक्रोशामुळे परिसरात हृदयद्रावक दृश्य पाहायला मिळाले.

अपघाताची माहिती मिळताच पंढरपूर शहर पोलीस, अग्निशमन दल आणि स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. बचावकार्य तातडीने सुरू करण्यात आले. गंभीर जखमींना क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढून रुग्णवाहिकेतून पंढरपूर येथील शासकीय व खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना सोलापूर येथे पुढील उपचारांसाठी हलवण्यात आले आहे. या अपघातात दोन लहान मुलांनाही गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर डॉक्टरांकडून अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. ऊसतोड कामगार हे कष्टकरी वर्गातील असल्याने या अपघाताने त्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतांच्या नातेवाईकांनी रुग्णालयात एकच आक्रोश केला. या प्रकरणी पंढरपूर पोलिसांनी पंचनामा केला असून प्रशासनाकडून मृतांच्या कुटुंबीयांना मदतीची घोषणा होण्याची मागणी केली जात आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# 'बिनविरोधा'चे राजकारण



महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमध्ये सत्ताधारी महायुतीचे ६७ हून अधिक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. या घटनेने भारतीय लोकशाहीतील निवडणुकांचे स्वरूप आणि मतदारांच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. १९५१ पासून आतापर्यंत ३५ खासदार बिनविरोध निवडून आले असले तरी, सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ही प्रथा वाढताना दिसत आहे. ग्रामपंचायतींमध्ये बिनविरोध निवडीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष निधी दिला जातो, ज्यामुळे ही पद्धत अधिक रुढ होत आहे. मात्र, यामुळे मतदारांना उमेदवार निवडण्याचा अधिकार हिरावला जातो आणि लोकशाही मूल्यांचे उल्लंघन होते, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, बिनविरोध निवडणुका खरोखरच लोकशाहीसाठी घातक आहेत का, यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमध्ये सत्ताधारी महायुतीचे तब्बल ६७ हून अधिक उमेदवार कोणत्याही मतदानाशिवाय थेट निवडून आले आहेत. या घटनेने राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. या बिनविरोध निवडींमुळे मतदारांना आपला हक्काचा उमेदवार निवडण्याचा अधिकारच मिळाला नाही, अशी टीका विरोधी पक्षांकडून केली जात आहे. ही घटना भारतीय लोकशाहीच्या मूळ तत्त्वांना धक्का पोहोचवणारी आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. भारतात बिनविरोध निवडणुका होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. १९५१-५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून आतापर्यंत एकूण ३५ खासदार लोकसभेवर बिनविरोध निवडून आले आहेत. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वाधिक सात उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यानंतर १९५१ आणि १९६७ च्या निवडणुकांमध्ये प्रत्येकी पाच उमेदवार बिनविरोध विजयी झाले होते. १९६२ मध्ये तीन आणि १९७७ मध्ये दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले होते, तर १९७१, १९८० आणि १९८९ च्या निवडणुकांमध्ये प्रत्येकी एक उमेदवार याच पद्धतीने विजयी झाला होता. सर्वात अलीकडील उदाहरण म्हणजे एप्रिल २०२४ मध्ये सुरत मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे मुकेश दलाल हे बिनविरोध निवडून आले. विशेष म्हणजे, या निवडणुकीत सुरतमध्ये तब्बल १६.५ लाख मतदारांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही. याशिवाय, २०२४ मध्ये अरुणाचल प्रदेशमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे १० उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या दशकांमध्ये बिनविरोध निवडींचे प्रमाण जास्त होते. उदाहरणार्थ, १९५७ मध्ये सात लोकसभा जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. मात्र, आता ही प्रथा स्थानिक पातळीवर अधिक वाढताना दिसत आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने पंचायत निवडणुकांमध्ये तब्बल ३४ टक्के जागा बिनविरोध जिंकल्या होत्या. ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध झाल्यास सरकारकडून विकासकामांसाठी विशेष निधी मिळतो, याला 'बक्षीस' म्हटले जाते. यामुळे निवडणुका बिनविरोध करण्याला प्रोत्साहन मिळते. ही योजना महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही राज्यांमध्ये फार पूर्वीपासूनच लागू आहे. त्यामुळे, याच धर्तीवर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकाही बिनविरोध व्हाव्यात का, यावर विचार होणे आवश्यक आहे. भारतात बिनविरोध निवडणुकीची तरतूद 'लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ च्या कलम ५३ (२)' मध्ये आहे. या कायद्यानुसार, नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याच्या मुदतीनंतर जर एकच वैध उमेदवार शिल्लक राहिला, तर त्याला थेट निवडून आल्याचे घोषित केले जाते. अशा वेळी मतदानाची गरज राहत नाही. ही तरतूद स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांना लागू होते. मात्र, सेंटर फॉर लीगल पॉलिसी या संघटनेच्या याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद आहे की, ही तरतूद घटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरुद्ध आहे. कारण मतदारांना 'नोटा' हा पर्याय वापरण्याचा अधिकार नाकारला जातो. २०१३ च्या पीयूसीएल विरुद्ध भारत या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'नोटा'ला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग मानले आहे. बिनविरोध निवडीत मतदान न होणे म्हणजे मतदारांचा नकाराचा अधिकार हिरावला जातो, यावर मुंबई उच्च न्यायालयात मनसे आणि काँग्रेसने याचिका दाखल केल्या असून चौकशीची मागणी केली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत इंदौरमध्ये काँग्रेसचा उमेदवार भाजपमध्ये सामील झाल्यानंतर काँग्रेसने आपल्या समर्थकांना 'नोटा'चा मार्ग अनुसरण्याची हाक दिली होती आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळाला. इंदूरने देशात सर्वाधिक २ लाख १८ हजार ६७४ एवढी 'नोटा' मते नोंदवून इतिहास रचला होता. एकूण मतांच्या १६.२८ टक्के मते 'नोटा'ला मिळाली होती. बिनविरोध निवडी लोकशाहीला कमकुवत करतात, कारण लाखो मतदार मतदानापासून वंचित राहतात. राजकीय पक्षांची जबाबदारी कमी होते. उमेदवार जनतेच्या परीक्षेला सामोरे न जाता निवडून येतो. दबाव आणि पैशाचा वापर वाढतो, ज्यामुळे राजकारण गुंडगिरीचे स्वरूप घेते. 'नोटा' हा नकाराचा अधिकार आहे, मात्र बिनविरोध प्रकरणात तो उपलब्ध नाही. यामुळे उमेदवाराला जनतेचा किमान पाठिंबा असण्याचीही गरज राहत नाही. बिनविरोध निवडणुका राजकीयदृष्ट्या संशयास्पद ठरतात, कारण अनेकदा त्या स्पर्धा नष्ट करण्यासाठी वापरल्या जातात. सत्ताधारी पक्ष विरोधी उमेदवारांना दबाव, पैशाचे आमिष किंवा धमक्या देऊन नामनिर्देशन मागे घ्यायला भाग पाडतात. पैशाच्या बॅगा, धमक्या, जुने गुन्हे उकरून काढणे या भरवशावर निवडणुका बिनविरोध केल्या जातात, असे उघड आरोप होतात. महाराष्ट्रातील अलीकडील प्रकरणात भाजपचे ४५, शिवसेना (शिंदे गट) चे २२ उमेदवार बिनविरोध निवडून आले. यानंतर विरोधी पक्षाने 'लोकशाही पैशाने विकत घेतली जात आहे,' असा आरोप केला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी त्याला 'लोकशाहीचा अपमान' म्हटले आहे. राज्य निवडणूक आयोगाने चौकशीचे आदेश दिले आहेत, मात्र नामनिर्देशन मुदत संपल्याने पुन्हा अर्ज भरण्याची तरतूद नाही. बिनविरोध निवड ही 'राजकीय परिपक्वता' दर्शवते असे मत त्यानंतर सत्ताधारी पक्षाकडून व्यक्त झाले, मात्र, असे घडणे दुर्मीळ असते आणि माघार बहुतेकदा दबावातूनच होते. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत काही पर्याय सुचवले आहेत. बिनविरोध उमेदवाराला कमीत कमी मतांची टक्केवारी आवश्यक असावी. 'नोटा'ला बिनविरोध प्रकरणातही पर्याय म्हणून समाविष्ट करावे. दबाव किंवा पैशांच्या आरोपांची स्वतंत्र चौकशी यंत्रणा असावी, तसेच बिनविरोध प्रकरणात मतदान अनिवार्य करावे. या पर्यायांवर विचार व्हायला हवा.

# यांना दिवसा चांदण्यांची भिती



एखाद्या मुख्यमंत्र्यांना दिवसरात्र राज्याच्या विकासासाठी, लोकांच्या सुविधेसाठी प्रयत्नरत रहावे लागते. असे असले, तरी याला बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या अपवाद ठरल्या आहेत. ८ जानेवारीला सकाळी अंमलबजावणी संचालनालयाने ('ईडी'ने) निवडणूक रणनीतीकार संस्था 'आयपॅक'चे प्रमुख प्रतीक जैन यांच्या कोलकात्यातील कार्यालयासह देशभरातील १५ ठिकाणांवर धाडी घातल्या. प्रतीक जैन तृणमूल काँग्रेसच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाचे प्रमुखही आहेत. या धाडीची माहिती मिळताच संतापलेल्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी थेट धाड घातलेल्या ठिकाणी पोचल्या आणि त्यांनी तेथील अनेक धारिका (फाइल्स) घेऊन स्वतःच्या गाडीत ठेवल्या. या काळात २ वेळा प्रसारमाध्यमांसमोर येऊन 'केंद्र सरकार बळजोरी करत आहे आणि केंद्रीय गृहमंत्री 'बदमाश' आहेत', असे वक्तव्य त्यांनी केले. या नाट्यमय घडामोडीच्या निमित्ताने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे नीतीहीन वर्तन देशाला पहायला मिळाले.

खासगी आस्थापनाच्या कार्यालयावर 'ईडी'ने धाड घातल्यावर राज्याची सगळी कामे सोडून धावलेल्या ममता बॅनर्जी जनतेपासून काय लपवत आहेत? हा सर्वांत मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. ज्या प्रतीक जैन यांच्या घरावर आणि 'आयपॅक' संस्थेवर ही धाड घातली गेली, त्यांचे धागेदोरे अब्जावधी रुपयांच्या कोळसा घोटाळ्याशी जोडलेले आहेत. जेव्हा केंद्रीय यंत्रणा याचा शोध घेण्यासाठी जाते, तेव्हा राज्याच्या मुख्यमंत्री स्वतःचे सर्व शासकीय दायित्व विसरून एखाद्या आंदोलकाप्रमाणे रस्त्यावर उतरतात. त्यांचे हे कृत्य कुणाला वाचवण्यासाठी आहे? ज्यांच्या हातामध्ये कायद्याचे रक्षण करण्याची सूत्रे आहेत, त्यांनीच कायद्याचे उल्लंघन करणे, याला काय म्हणायचे? सामान्यतः मनातील चांदण्यांची सवय चोरांना असतेच; पण मुख्यमंत्री असलेल्या ममतादीदींना चांदण्यांची भीती का वाटत आहे?

## ही ममता अशुद्धच!

चांदण्यांच्या या भीतीमागे बंगालमधील कोळसा घोटाळा हे कारण समोर येत आहे. हा काही आजचा घोटाळा नाही. हा सहस्रो कोटी रुपयांचा महाघोटाळा आहे, ज्याने राज्याच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट केली आहे. 'ईस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड'च्या खाणींतून बेकायदेशीरपणे कोळसा उपसून तो काळ्या बाजारात विकला गेला. या कृत्याचा मुख्य सूत्रधार अनुप मांझी उपाख्य 'लाला' असून त्याचे संबंध तृणमूल काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि अगदी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यापर्यंत पोचल्याचा दाट संशय आहे. या कोळसा तस्करीतून मिळालेला काळा पैसा हवालाच्या मार्गाने निवडणूक रणनीती आखणाऱ्या 'आयपॅक'पर्यंत पोचला आणि 'आयपॅक'चे प्रमुख प्रतीक जैन यांच्या माध्यमातून हा पैसा निवडणुकीत वापरला गेल्याचा आरोप आहे. यावरून ममता बॅनर्जी यांनी केलेले आकांडतांडव वरील प्रश्नांचे उगमस्थान आहे. ममता बॅनर्जी त्यांनी त्यांच्या वर्तनातून त्यांना देश, राज्यघटना, राज्य आणि राज्यातील नागरिक यांच्याविषयी कोणतीही 'ममता' नसून केवळ स्वतःच्या पक्षाच्या धारिका अन् 'हार्डडिस्क' यांविषयीच 'ती' आहे, हे दाखवून दिले आहे.

'ममता बॅनर्जी बंगाल राज्य चालवत नाहीत, तर अराजक निर्माण करणारे केंद्र चालवतात', असे म्हटल्यास वावगे नाही. तेथे हिंदूंच्या देवतांच्या मूर्ती फोडल्या जातात, हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या होतात, हिंदुत्वनिष्ठांच्या शिरच्छेदाची भित्तीपत्रके दिवसाढवळ्या झळकतात, धर्मांध आमदारांची मुले पोलिसांवर हात उगारतात, मुसलमानांचे लांगूलचालन होते, तृणमूलचा धर्मांध कार्यकर्ता उघडपणे 'जागो माँ' गाणे म्हणणाऱ्या गायिकेच्या अंगावर धावून जातो, हे अल्प पडते; म्हणून डॉक्टर अथवा सामान्य महिलांवर अनन्वित अत्याचार झाल्यावर अत्याचाऱ्यांवर कारवाई न करता महिलांच्या आंदोलनात याच जनताद्रोही ममता बॅनर्जी सहभागी होतात. केंद्रीय प्रशासन अथवा सरकारची विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रिया, समान नागरी कायदा, नागरिकत्व सुधारणा कायदा यांच्या विरोधात मुख्यमंत्री स्वतःच उभ्या रहातात. ममता बॅनर्जी यांच्या मुख्यमंत्री कार्यकाळातील अशा घटनांची सूची न संपणारी आहे. एवढे असूनही ममता बॅनर्जी स्वतः मानवतावादी, धर्मनिरपेक्ष असल्याचे मोठ्या दिमाखात सांगतात. त्यामुळे अशा नानाविध काळ्या कृत्यांनी काळवंडलेल्या ममता शुद्ध असूच शकत नाहीत, हे स्वच्छ सत्य आहे.

## कुठे गेली लोकशाही?

ममता बॅनर्जी यांनी ईडीच्या कारवाईच्या वेळी केलेल्या बेकायदेशीर कृत्यात बंगाल राज्याच्या पोलिसांनी त्यांना साथ दिली. ज्या पोलिसांनी गुन्हेगारांना पकडायला हवे, तेच पोलीस केंद्रीय अधिकाऱ्यांच्या कामात अडथळे आणत होते. 'मुख्यमंत्री बॅनर्जी आणि पोलीस यांच्या संगनमताने पुराव्यांत फेरफार करण्यात आला आहे', असे ईडीने उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिकेत म्हटले आहे. ममता यांनी केलेली चोरी प्रसारमाध्यमांच्या कॅमेऱ्यात ढळढळीतपणे पकडली गेली, तरीही तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी न्यायालयात मोठा गोंधळ माजवला. त्यामुळे न्यायालयाला या प्रकरणात कारवाई करता आली नाही आणि सुनावणी पुढे ढकलावी लागली.

यापूर्वी वर्ष २०१९ मध्ये कोलकाता पोलीस आयुक्त राजीव कुमार यांच्या घरी पोचलेल्या सीबीआय अधिकार्यांच्या पथकाला बंगाल पोलिसांनी कह्यात घेतले होते. तो प्रसंगही मोठा नाट्यमयरित्या घडला होता. ज्या मुख्यमंत्र्यांनी कायद्याचे रक्षण करण्याची शपथ घेतली आहे, त्या स्वतः ईडीने जप्त केलेले पुरावे स्वतःच्या गाडीत भरून तिथून निघून जातात. हे कृत्य म्हणजे 'पुरावे नष्ट करणे' या श्रेणीतील गंभीर गुन्हा आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या सैनिकांना आणि ईडीच्या अधिकाऱ्यांना राज्य पोलिसांच्या बळावर धाक दाखवणे, हा 'राजकीय आतंकवाद' आहे. पक्षपाताविना काम करण्याची घेतलेली शपथ त्या वारंवार पायदळी तुडवत आल्या आहेत. लोकशाही संपवल्याचा आरोप ममता बंगालमध्ये स्वतः कोणत्या लोकशाही तत्त्वाचे पालन करत आहेत? एखाद्या चित्रपटामध्ये खलनायक जसा कायदा धाब्यावर बसवतो, तसाच प्रकार बंगालमध्ये ममता करत आहेत. बंगालमध्ये सीबीआयच्या अधिकार्यांना बंदी बनवणे असो किंवा आता ईडीच्या कामात अडथळा आणणे असो, ममता बॅनर्जी बंगालमध्ये 'ममताराज' चालवत आहेत, हे उघड आहे. अन्वेषण यंत्रणांचे खच्चीकरण आणि पोलिसांचा दुरुपयोग, तसेच कोणत्याही केंद्रीय यंत्रणा, केंद्र सरकार यांना न बधण्याची त्यांची हेकेखोर वृत्ती बंगालला भारतापासून वेगळे करण्याची चाल आहे, हे येथे समजून घ्यायला हवे.

बंगालचे अस्तित्व टिकवण्यासाठी बंगाली जनतेने येर्णाया निवडणुकीत आडमुठ्या, हेकेखोर, जनताद्रोही आणि नाटकी मुख्यमंत्र्यांसह त्यांच्या पक्षाचे तृणमूलाएवढेही अस्तित्व शिल्लक न ठेवता त्यांना दिवसा चांदणे दाखवावे!

# खासगीकरणाचे डोहाळे



शिक्षणामधील सरकारची गुंतवणूक (याला 'खर्च' म्हणण्याचा प्रघात असला, तरी प्रत्यक्षात ती गुंतवणूकच आहे) कमी होत असताना, राज्यातील दोन नामांकित शिक्षणसंस्था आपल्याला मिळणारे अनुदान नाकारून स्वतंत्र होऊ इच्छित असल्याची बातमी चिंताजनक आहे. यापूर्वी काही अनुदानित शाळांनीही अशी मागणी केली होती. सरकारी आणि अनुदानित महाविद्यालये आणि विद्यापीठे यांमधील शिक्षकांची कमतरता आणि साधनसुविधांचा अभाव या गोष्टी नव्या नाहीत. याच कारणांमुळे उच्च शिक्षणसंस्थांच्या क्रमवारीत या संस्था काही खासगी संस्थांच्या तुलनेत मागे पडत आहेत.

यामुळे सरकारी अनुदान नाकारून व हवे तसे शुल्क आकारून निधीची चणचण दूर करून सुविधा वाढविण्याचा विचार अनुदानित संस्था करीत असल्याचे दिसते. गेल्या काही वर्षांत देशात खासगी विद्यापीठांची संख्या वेगाने वाढून शिक्षणाचा विस्तार झाल्याचे चित्र निर्माण झाले असले, तरी ते आभासी आहे; कारण या विद्यापीठांकडून आकारले जाणारे भरमसाठ शुल्क भरण्याची आर्थिक शक्ती मूठभर उच्चभ्रूंचीच आहे. या विद्यापीठांचे शुल्क निश्चित करण्यासह विविध गोष्टींसाठी सरकारने यंत्रणा निर्माण केल्या असल्या, तरी नियमांना वाकविण्याची क्षमता असल्याने त्या परिणामशून्य ठरत आहेत. त्यामुळे स्वायत्त संस्था होण्याची इच्छा बाळगणारे वाढत आहेत आणि त्यासाठी ते सरकारी अनुदानावर पाणी सोडण्यासही तयार आहेत.

समाजातील सर्वांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण मिळावे यासाठी सरकारने गांभीर्याने पावले टाकणे गरजेचे व महत्त्वाचे आहे. सध्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा (एनईपी) उदोउदो सुरू आहे. मात्र, मुळात हे धोरणच खासगीकरणाला चालना देणारे आहे; कारण शिक्षणावरील खर्चाबाबत ते भाष्य करीत नाही. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची कोठारी आयोगाची शिफारस या धोरणात असली, तरी ती प्रत्यक्षात कशी आणायची याबाबत कोणतीही सूचना त्यात नाही.

या धोरणाने उच्च शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी उद्दिष्टे ठेवली आहेत; परंतु त्यासाठी निधीची तरतूद नाही. त्यामुळे उद्दिष्टपूर्तीसाठी खासगीकरणाचाच आधार घ्यावा लागणार. देशात गेल्या तीन दशकांपासून आणि महाराष्ट्रात त्याच्याही आधी म्हणजे चार दशकांपासून खासगीकरणाचाच मंत्र जपला जात आहे. 'कायमस्वरूपी विनाअनुदानित' किंवा 'स्वयंअर्थसहायित' हे शब्द राज्यातील शिक्षण व्यवस्थेत चांगलेच रुजले आहेत. यामुळे नवनवीन व्यावसायिक शाखांच्या शिक्षणाची सोय झाली आणि महाविद्यालये-विद्यापीठे वाढली हे खरे; परंतु तिथे केवळ क्रयशक्ती असणाऱ्यांनाच प्रवेश असल्याने सामाजिक आणि आर्थिक दुर्बलांना सरकारी संस्थांशिवाय दुसरा आधार नाही. समाजातील या दुर्बल घटकांचाही वाली होण्यासाठी मग या घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शिक्षणसंस्थांत पूर्ण वा अंशतः शुल्क माफ करण्याची योजना सरकारने सुरू केली.

हे पाऊल स्वागतार्ह असले, तरी यामुळे गुणवत्ताशून्य खासगी संस्थांनाही सरकारी निधीचा प्रवाह सुरू झाला. याच्या ऐवजी सरकारने प्रत्येक जिल्ह्यांत सर्व शाखांसाठीची महाविद्यालये सुरू केली असती आणि विद्यमान सरकारी/अनुदानित संस्थांचा निधी वाढविला असता, तर सार्वजनिक सुविधा विकसित झाल्या असत्या. मात्र, तसे न करता खासगी संस्थांना अप्रत्यक्ष मदतीचा मार्ग अवलंबला गेला. ही एक प्रकारे कूपन पद्धत म्हणजे सरकारी संस्था निर्माण न करता विशिष्ट शुल्काची मदत करण्याची पद्धत म्हणायला हवी.


# 'ती'चं शिक्षण अजूनही अपूर्णच आहे का?

नुकतीच आपण सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली. आजच फातिमाताईंची १९५ वी जयंती साजरी होत आहे. या दोन्ही आद्य शिक्षिकांनी भिडे वाड्यात चालवलेली शाळा म्हणजे महाराष्ट्रातील जातीय आणि हिंदू-मुस्लिम धार्मिक सलोख्याचे कृतिशील शिल्प आहे असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही. परंतु आजही बहुजन समाजातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. यामध्ये अनेक अडचणी आहेत आणि मुस्लिम मुली अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत. सच्चर आयोगाच्या अहवालानुसार, मागासवर्गीय होऊनही मुस्लिम समाजाची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती मागास आहे, असे नोंदवण्यात आले आहे.

म्हणूनच स्वतंत्र भारतातील ७५ वर्षांनंतर प्रजासत्ताक व संविधान स्वीकारल्यानंतरही स्त्रियांचा, विशेषतः अल्पसंख्यांक, भटक्या, दलित व बहुजन समाजातील स्त्रियांना सामाजिक न्याय मिळवून देऊ शकलो का, हा प्रश्न उभा राहतो. बदललेल्या राजकीय परिस्थितीत तर प्रतिक्रांती जाणवत आहे. महाराष्ट्रात पटसंख्या अभावी हजारोंच्या संख्येने प्राथमिक आणि माध्यमिक शाळा बंद होत आहेत. त्यामुळे पहिला शिक्षणाचा बळी पुन्हा ग्रामीण, गरीब, अल्पसंख्यांक आणि मागास जनजातीतील मुलींचाच जाणार हे स्पष्ट आहे. यासाठी उठाव होण्याची गरज आहे. पण ज्या शिक्षकांची नोकरी धोक्यात आहे, ते प्रत्यक्ष प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवायला तयार नाहीत.

सामाजिक कार्यकर्ते व्हॉट्सॲपवर कृतिशील आहेत, पण प्रत्यक्ष रस्त्यावर लढायला कोणी येत नाही. महाराष्ट्रात सामाजिक कार्यकर्त्यांचे खून झाले, त्यानंतर सामाजिक संघटनांचे अस्तित्व कृतिशील राहिलेले नाही. नवीन पिढी सामाजिक संघटना आणि संस्थांमध्ये स्वतःहून येताना दिसत नाही. अगदी पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते असलेले मोठे डाव्या विचाराचे नेतेही आपल्या घरातील मुलांना मोठ्या प्रमाणावर परदेशी पाठवतात. प्रत्येकाला स्वतःचा विकास व अस्तित्व महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांनी तरी या सामाजिक कार्याकरिता अपवाद असावे का...?

सावित्रीबाईंची जयंती साजरी करताना, मंचावरून विचार मांडताना मनात विरोधाभासी विचार येत होते. समोर बसलेल्या सर्व मैत्रिणी एकतर अर्धशिक्षित किंवा अशिक्षित होत्या. शेतकरी व बचत गटातील मैत्रिणी, अंगणवाडी कार्यक्रमाला हजर होत्या. पण सावित्रीबाईंच्या संघर्षातून ज्यांना शिकायला मिळाले, ज्या उच्च पदस्थ झाल्या, उच्च विद्याविभूषित झाल्या, त्यापैकी कोणीही जयंती साजरी करायला वेळ काढलेला दिसला नाही. माज्या मनात प्रश्न उभा राहतो- शिक्षणाने खरोखरच आपल्याला सुशिक्षित केले, लढायला शिकवले, निर्भय बनवले का.. ? की फक्त पोटासाठी वापरण्यायोग्य बनवले? त्यावेळी सातारा शहरात मुख्य प्रवाहातील अखिल भारतीय साहित्य संमेलन सुरू होते. त्याचवेळी मोफत 'हास्यजत्रा' सुरू होती. मध्यमवर्गीय, उच्च-मध्यमवर्गीय स्त्रिया नटून-थटून त्या कार्यक्रमाला गर्दीने हजर होत्या. ज्या सावित्रीबाईंचा विसर पडतो, ज्यांना बाबासाहेब आंबेडकरांचा विसर पडतो, ज्यांना महात्मा जोतिराव फुले माहीत नाहीत, त्यांना शिक्षण मिळाले. ते शाळा आणि कॉलेजमध्ये गेले, डिग्री मिळवली, परंतु या सर्व सामाजिक विचारांशी त्यांचा संबंध नाही, तर त्यांनी केलेल्या संघर्षाचा लाभ कोणाला झाला आणि का झाला, असा प्रश्न निर्माण होतो. खरोखरच, अशा कृतघ्न लोकांसाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य खर्च करावे का?



सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी रचलेला सामाजिक सलोख्याचा पाया आजही धोक्यात असून, स्त्रियांच्या संघर्षाचे वास्तव केवळ कागदावरच मर्यादित राहिले आहे का?

आजही मुलींची संख्या कमी आहे. महाराष्ट्रात ५३ हजारांहून अधिक मुली गर्भरूपातच गायब होत आहेत. आजही शंभरपैकी ३० लग्न बालविवाह स्वरूपात होताना दिसत आहेत आणि ४० हजारांहून अधिक बालिका लैंगिक अत्याचाराच्या बळी जात आहेत. सोळा हजारहून अधिक शाळा बंद होणार असून, ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणावर गदा आली आहे. किशोर वयोगटातील मुली ॲनिमियामुळे आणि घरातील काम, पाणी आणणे, जळण गोळा करणे, भावंडं सांभाळणे यांसारख्या कारणांमुळे अनेकदा मृत्युमुखी पडत आहेत. स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचार, कौटुंबिक अत्याचार, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. आंतरधर्मीय व आंतरजातीय लग्नानंतर होणारे ऑनर किलिंगचे प्रकार महाराष्ट्रात वाढले आहेत. मात्र, स्त्रिया बचत गटात संघटित होत आहेत. पंधराशे रुपये घेऊन का होईना, त्या स्वबळावर मतदान करत आहेत. बचत गट फायनान्स कंपनीच्या विळख्यात असले तरी स्त्रिया आणि त्यांच्या कुटुंबांचे शोषण होत आहे.

आज ५० लाखांहून अधिक स्त्रिया जोखमीच्या बिडी उद्योगात कार्यरत आहेत, दहा लाखांहून अधिक स्त्रिया पहाटे तीन ते दुपारी तीन वाजेपर्यंत उसाच्या शेतामध्ये कोणताही मोबदला न घेता काम करतात. आपल्या सकाळच्या चहाला गोडवा आणणाऱ्या, बांधकाम करणाऱ्या, भाजी विकणाऱ्या, मासे विकणाऱ्या स्त्रिया या आर्थिक उलाढालीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. परंतु त्या असंघटित क्षेत्रात समान कामासाठी तुटपुंज्या वेतनावर काम करतात.

समान कामाला समान वेतन मिळवण्यासाठी आणि कामगार कायदे वापरण्यासाठी लढे उभारले गेले, परंतु ७५ वर्षांत निर्माण झालेले १५ कामगार कायदे रद्द केले गेले, चार नवीन आचारसंहितेचे कायदे आले आहेत, जे कॉर्पोरेट धोरणांसाठी उपयुक्त आहेत. त्यामुळे भविष्य अजूनही अनिश्चित आहे.

नुकत्याच इंजिनिअर झालेल्या आणि सरकारी नोकरीत असणाऱ्या एका अविवाहित तरुण मुलीने संघटित क्षेत्रातील नोकरीत कशाप्रकारे स्त्रियांशी वागले जाते याबाबतची भयंकर गोष्ट निदर्शनाला आणून दिली. त्यामुळे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जिल्हा परिषदा, बँका, महसूल विभाग, बांधकाम विभाग या ठिकाणी कायमस्वरूपी किंवा कंत्राटी पद्धतीने नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे मोठ्या प्रमाणावर लैंगिक शोषण होत असते. त्या ठिकाणी कायद्याने विशाखा समिती असल्या तरी त्या सक्रिय नाहीत. परंतु कंत्राटी पद्धतीने असणाऱ्या नोकऱ्यांमुळे आणि वरिष्ठांच्या भीतीमुळे होणाऱ्या लैंगिक छळाला आणि भ्रष्टाचाराला त्या विरोध करू शकत नाहीत. यासाठी आमच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्यासाठी लढण्याची सुपारी घ्यावी असे त्यांना वाटते ही फार भयंकर गोष्ट आहे. स्त्रियांसाठी ४२ हून अधिक कायदे बनवल्यानंतरही ते कायदा वापरण्याचं धारिष्ट्य आणि कौशल्य जर शिकलेल्या महिलांमध्ये येत नसेल तर त्या फक्त अर्थार्जन करणाऱ्या आणि पारंपरिक पद्धतीने घरदार सांभाळणाऱ्या सुपरवुमन होत आहेत हा एकप्रकारे नवीन नवशिक्षित नोकरदार महिलांमध्ये येत असलेला निर्माण केला जाणारा आजारच होतोय की काय, अशी मला भीती वाटते आहे. तथापि, बलात्कार, कौटुंबिक हिंसा, बालविवाह, लैंगिक अत्याचार यांसारख्या घटनांमुळे स्त्रिया अजूनही संघर्ष करत आहेत. सावित्रीबाईंचा वारसा सांगणाऱ्या फातिमाच्या संघर्षामुळे शाळेत जाऊ शकलेल्या मुली जरी अल्पसंख्य असल्या तरी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्या. त्या आपल्या जीवनापेक्षा मोठे स्वप्न पाहतात आणि मुलांच्या भवितव्यासाठी संघर्ष करतात.

दहा लाखांहून अधिक ऊसतोड करणाऱ्या महिला मजुरांची वेठबिगारी थांबवायची आहे. गर्भात गायब होत असलेल्या ५३ हजारांहून अधिक मुलींना जीवन मिळावं म्हणून झगडायचं आहे, विडी वळणाऱ्या १७ लाखांहून अधिक बालिकांचे शोषण रोखायचे आहे, लाखोंच्या संख्येने युद्धावर निघाल्याप्रमाणे नोकरीवर निघणाऱ्या आमच्या मेट्रो शहरातील लोकलमधून प्रवास करणाऱ्या मैत्रिणींचा प्रवास सुखकर करायचा आहे, लैंगिक अत्याचाराला बळी गेलेल्या ४० हजारांहून अधिक बालकांसाठी न्याय मागायचा आहे, हजारोंच्या संख्येने कुटुंबांतर्गत हिंसा सोसणाऱ्या मैत्रिणींना हिंसामुक्त कुटुंब मिळावं म्हणून पुरुषांना शहाणं करायचं आहे, समान कामाला समान वेतन मिळवण्यासाठी आणि जीडीपीच्या हिशेबात आमचे कामही मोजा आणि आम्हालाही जगाच्या अर्थकारणात दोन तिहाई काम करूनही स्थान का नाही, हा प्रश्न उपस्थित करायचा आहे, शेताची मालकीण व्हायचं आहे, घराबाहेर स्वतःच्या नावाचा फलक लावायचा आहे. बंद होत असलेल्या शाळा सुरू राहतील आणि मुलींना शिकता येईल यासाठी एल्गार पुकारायचा आहे. शिकल्या सवरलेल्यांना नोकरीत सहाव्या वेतन आयोगाने पगार घेणाऱ्या आमच्या मैत्रिणींना सावित्रीचा विसर पडलाय याची आठवण करून द्यायची आहे. विविध ग्रामपंचायतींमध्ये आणि जिल्हा परिषदांमध्ये काही थोड्या संख्येने का होईना संसदेत आणि विधानसभेत लोकप्रतिनिधित्व म्हणून आमचं प्रतिनिधित्व करणाऱ्या स्त्रियांना या प्रश्नांची जाण येईल यासाठी प्रयत्न करायचा आहे. बरंच काही केलं आहे, पण अजून बरीच धोरणं आखायला सरकारला भाग पाडायचे आहे. त्यासाठी आर्थिक अंदाजपत्रकातही स्थान मिळवायचे आहे आणि मतदार म्हणून केवळ पंधराशे रुपये देऊन आम्ही त्यांना सत्तेवर सुखाने राहू देऊ असं वाटत असल्यास सजग नागरिक म्हणून जागरूक राहून सावित्रीचा वारसा पुढे चालवायचा आहे.

**जय ज्योती, जय सावित्री!**

# डेली डाएटमधून इतक्या कॅलरी करा कमी...



जर तुम्ही हेल्दी असाल आणि तरी सुद्धा तुम्हाला वजन कमी करायचं असेल किंवा फिट रहायचं असेल तर डेली डाएटमधून दररोज काही कॅलरी कमी करून तुम्ही वजन कमी करू शकता. तसेच कॅलरी कमी केल्याने तुमचं आरोग्यही चांगलं राहील. याआधी झालेल्या अनेक रिसर्चमधून ही बाब समोर आली आहे की, लो-कॅलरी डाएटचं सेवन करून आरोग्याशी संबंधित अनेकप्रकारच्या समस्या दूर होतात. अशात तुमचं वय वाढलं तरी तुम्ही तरूण दिसाल.

**डाएटमधून किती कॅलरी कमी कराव्या :** नुकत्याच झालेल्या एका नव्या रिसर्चमधून समोर आले आहे की, डेली डाएटमध्ये दररोज केवळ ३०० कॅलरी कमी करून शरीरात कलेस्ट्रॉलचं प्रमाण, ब्लड प्रेशरचं प्रमाण आणि ब्लड शुगरचं प्रमाण चांगलं होतं. सोबतच अनेकप्रकारच्या मेटाबॉलिज्मशी संबंधित आजार तुमच्या जवळही भटकणार नाहीत. केवळ वेट लॉस नाही तर आरोग्यही चांगलं राहतं द लँसेट डायबिटीस अ‍ॅन्ड इंडोक्रिनोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित या रिसर्चमध्ये या गोष्टीचं समर्थन करण्यात आले आहे की, कमी कॅलरीचं सेवन केल्याने केवळ वजन कमी होतं असं नाही तर तुमचं आरोग्यही चांगलं राहतं आणि शरीरात कॉम्प्लेक्स मेटाबॉलिक बदलही होत नाहीत. रिसर्चमध्ये ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, जर तुम्ही तुमच्या दररोजच्या कॅलरी इनटेकमध्ये कमतरता आणाल तर याने ना केवळ वजनच कमी होईल तर डायबिटीस आणि हृदयाशी संबंधित धोकाही कमी होतो.

**२ वर्ष कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट :** या रिसर्चमध्ये अभ्यासकांनी २१ ते ५० वयोगटातील २०० महिला आणि पुरूषांची निवड केली आणि त्यांना दोन वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागण्यात आले. एका ग्रुपला सांगण्यात आलं की, त्यांना २ वर्षांपर्यंत कॅलरी रिस्ट्रिक्शनची प्रॅक्टिस करायची आहे. या लोकांना सांगण्यात आले की, ते त्यांना हवं ते खाऊ शकतात. पण एक अट आहे. ती म्हणजे त्यांना त्यांच्या रोजच्या कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट करायची होती. तेच दुसऱ्या ग्रुपला सामान्य रूपाने खाणं-पिणं करण्यास सांगण्यात आलं.

**७१ टक्के लोकांचं वजन १० टक्के घटलं :** ज्या ग्रुपमधील लोकांना कॅलरी कमी करण्यास सांगण्यात आले होते, त्यांच्यातील जास्तीत जास्त लोक २५ टक्के कॅलरी करण्याचं टार्गेट पूर्ण करू शकले नाहीत आणि २ वर्षात त्यांनी सरासरी कॅलरीमध्ये ११.९ टक्के घट केली होती. जी दररोजच्या ३०० कॅलरीच्या बरोबरीत आहे. अभ्यासकांना आढळलं की, केवळ १ वर्षातच या ग्रुपमधील लोकांच्या कोलेस्ट्रॉल आणि ब्लड प्रेशरमध्ये कमतरता आढळली. सोबतच साधारण ७१ टक्के लोक त्यांचं वजन १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यशस्वी ठरले.

**प्रोसेस्ड फूड करा अव्हॉइड :** डाएटमध्ये हेल्दी करणे जसे की, फळ आणि भाज्यांचं जास्त सेवन करावं आणि प्रोसेस्ड फूड खाणं कमी करावं. हे दोन्ही प्रभावी उपाय आहेत. या माध्यमातून तुम्ही कॅलरी कमी करू शकता आणि हेल्दी राहू शकता.

# मंत्रांमध्ये असणारी शक्ती



परिवार रक्षामंत्र

**अरिहे सर्व रक्ष हँ फट् स्वाहा।**

हा कुटुंबाचे संरक्षण करणारा मंत्र रोज सकाळी आणि सायंकाळी १ माळ जपून म्हटल्याने आलेले संकट दूर होते.

रोगनिवारक मंत्र

**नमो विप्पोसही पत्ताणं नमो खेलो सहि पत्ताणं नमो जल्लो सहि पत्ताणं नमो सव्वो सहि पत्ताणं स्वाहा।**

हा मंत्र म्हणत दररोज एक माळ जपल्याने सगळ्या प्रकारच्या रोगांपासून मुक्ती मिळते. आपले कष्ट कमी होतात.

द्रव्यप्राप्ती मंत्र

**ह्यी नमो अरिहंताणं सिद्धाणं आयरियाणं उवज्झायाणं साहूणं मम ऋद्धि-वृद्धी-समीहितं कुरू कुरू स्वाहा।**

या मंत्राचे दररोज सकाळ, दुपार, सायंकाळी प्रत्येक वेळी ३२ वेळा मनातल्या मनात जप केल्याने सुख-समृद्धी, धनलाभ आणि कल्याण होते.

**ह्यी श्री कलिकुंड स्वामिने नमः।**

या मंत्राचा सव्वा लाख जप केल्याने कठिणातील कठीण काम सिद्धीस जाते. गरिबी दूर होऊन लक्ष्मी प्राप्ती होते.

**नमो भगवते श्री पार्श्वनाथाय क्षेमं कराय ह्यी नमः।**

या मंत्राचा जप केल्याने अचानक येणारे संकट आणि भीती दूर होते.

**ह्यी श्री हर-हर स्वाहा।**

हा मंत्र दररोज १०८ वेळा जप केल्याने रोग, संकट आणि कोणत्याही प्रकारची चिंता दूर होते.

# सिगरेट न पिणाऱ्यांना फुफुसांचा कॅन्सर होण्याचं प्रमाण वाढत चाललंय

खरे पाहता फुफुसाचा कँसर हा शब्द ऐकल्यावर आपल्यासमोर प्रतिमा उभी राहते ती एका मागोमाग एक असा सिगारेट ओढण्याचा सपाटा लावणाऱ्या चेन स्मोकर्सची. फुफुसाचा कँसर हा सिगारेटच्या, तंबाखूच्या व्यसनामुळे होतो हे आज अगदी सर्वमान्य, जगन्मान्य तत्व आहे. आत्तापर्यंत डॉक्टर तरी हेच समजत होते परंतु नव्या आलेल्या काही धक्कादायक संशोधांचे निष्कर्ष असे सांगतात की ज्या व्यक्तीने कधी तंबाखू खाल्ली नाही किंवा सिगारेट ओढलेली नाही अशा व्यक्ती सुद्धा फुफुसाच्या कँसरला बळी पडू शकतात. खरे पाहता कँसरचं प्राथमिक तत्व हेच आहे की शरीरातील पेशींमध्ये अचानक आणि असामान्य अशी होणारी वाढ. ही वाढ लगेच होत नाही. शरीरात अनेक वर्षे साठून अचानकपणे अशा वाढीचा उद्भव होवू शकतो. त्यामुळे फुफुसाच्या कँसर ला जबाबदार असणारा धूर हा महत्वाचा घटक सिगारेट पिणाऱ्या किंवा न पिणाऱ्या अशा दोन्ही व्यक्तींच्या आयुष्यावर परीणाम करू शकतो. आपण समजून घेऊया की कुठल्या पद्धतीने आणि कुठल्या कारणासाठी सर्वसामान्य सिगारेट न पिणाऱ्या व्यक्ती अशा महाभयानक रोगाच्या विळख्यात सापडतात.


१. **सिगरेटचा धूर पसरलेल्या वातावरणात राहिल्यामुळे :** खरे पाहता जी व्यक्ती सिगारेट पिते तिच्या फुफुसामध्ये निकोटीन साठून राहिलेले असते. मात्र ज्या ठिकाणी बराच काळ व्यक्ती सिगारेट ओढत राहतात अशा वातावरणात देखील ज्या सिगारेट न ओढणाऱ्या व्यक्तींना काम करण्याची वेळ येते तेव्हा त्यांच्याही फुफुसामध्ये वातावरणामध्ये पसरून राहिलेला निकोटीन आणि टार जातो. अनेकदा सिगारेट ओढून झाल्यावर राहिलेले थोटूक न विझवता तसेच सोडले जाते. या थोटकांमधून निघणारा धूर वातावरण प्रदूषित करत राहतो आणि याच वातावरणात जिथे काम करत राहावे लागते अशा व्यक्तीना याचा धोका संभवतो. या क्रियेला सेकंड-हँड स्मोकिंस म्हणतात. म्हणजे सिगारेट ओढली तर नाही पण सिगारेट च्या धुरात खूप वेळा काम करण्याची किंवा रहाण्याची वेळ तर येते अशा वेळी त्या ही व्यक्तीला फुफुसे दुषित होण्याचा धोका सतावतो.

२. कँसरला कारणीभूत ठरणाऱ्या कार्सिनोजेनिक घटकांच्या सानिध्यात केले जाणारे काम काही काही व्यक्तींचे व्यवसाय अत्यंत दुर्दैवी असतात. खाण कामगार, कोळशाच्या खाणीत, वाळूच्या खाणीत काम करणारे लोक कामाच्या ठिकाणी होणाऱ्या प्रदूषणाचे शिकार बनत राहतात. अभ्रकाच्या खाणी तसेच डीझेल चे जे साठे असतात त्या ठिकाणी कँसर ला कारणीभूत ठरणारी कार्सिनोजेनिक घटक प्रचंड प्रमाणात वातावरणात भरून राहिलेले असतात. डीझेल इंजिन असतात त्यांच्यामधून देखील मोठ्या प्रमाणात कार्सिजेन उत्सर्जित होतो. त्यामुळे अशा ठिकाणी काम करणारे लोक भले सिगारेट ओढत नसतील तरीही त्यांच्या बाबतीत कँसर चा धोका जास्त प्रमाणात असतो.

३. **हवा प्रदूषण :** सार्वजनिक वाहतुकीमधून केले जाणारे जे हवेचे प्रदूषण असते त्याच्या धुरात देखील कँसर ला कारणीभूत ठरणारे घटक असतात. अत्यंत दाट लोकवस्तीचे प्रदेश आणि वाहनांची प्रचंड गर्दी असलेल्या ठिकाणी पेट्रोल डीझेल च्या धुरातून होणारा उत्सर्ग कँसर च्या कार्सिजेनिक घटकांचे प्रमाण वाढवतो. २०१० साली डीझेल प्रदूषणाचे जागतिक ओझे या नावाने एक रिपोर्ट प्रसिद्ध करण्यात आला होता त्यात २०१० साली जवळजवळ २,२३,००० मृत्यू हे फुफुसाच्या कँसर चे होते ते ही फक्त डीझेल प्रदुषणाच्या प्रमुख कारणामुळे झालेले असा निष्कर्ष नोंदवण्यात आलेला होता.

४. **रेडीएशन :** किरणोत्सगार्चा संसर्ग किती भयानक असू शकतो हे आपणास हिरोशिमा आणि नागासाकी च्या उदाहरणावरून ठाऊक आहे. खरे पाहता आज असे अनेक उद्योग धंदे आहेत ज्याच्यामधून रेडन नावाचा गॅस बाहेर पडतो. या अप्रत्यक्षपणे वातावरणात पसरणाऱ्या रेडीएशनचा परिणाम म्हणून हवा दुषित होते. अशा वातावरणात राहणाऱ्या आणि काम करणाऱ्या लोकांना फुफुसाचा कँसर होण्याचा धोका सिगारेट ओढणाऱ्या व्यक्तीपेक्षा जवळजवळ ७० पट जास्त संभवतो.

त्यामुळे सिगारेट न पिणाऱ्या व्यक्तींना देखील आपल्या वातावरणाचा अभ्यास करण्याची आणि आपल्या आजूबाजूच्या परिसरात काम करताना काळजी घेण्याची गरज आहे.



# मऊ आणि मुलायम केसांसाठी गुलाबाच्या पाकळ्यांचा असा करा वापर

गुलाबाच्या पाकळ्या, गुलाब पावडर अथवा गुलाबपाण्याचा वापर तुम्ही तुमच्या त्वचेचं सौंदर्य वाढवण्यासाठी अथवा डोळ्यांना थंडावा देण्यासाठी नक्कीच केला असेल. मात्र तुम्हाला गुलाबाच्या पाकळ्या केसांसाठीदेखील तितक्याच उपयुक्त आहे हे माहीत आहे का. केसांमधील कोंडा कमी करण्यासाठी, केस चमकदार आणि मऊ करण्यासाठी, तेलकट केसांचा चिकटपणा कमी करण्यासाठी असं तुम्ही अनेक गोष्टींसाठी गुलाबपाणी, गुलाबाच्या पाकळ्या अथवा गुलाब पावडर वापरू शकता. गुलाबपाण्यामध्ये नैसर्गिक पोषक घटक असतात ज्यामुळे तुमच्या केसांचे सौंदर्य वाढू शकते. गुलाबपाण्यात व्हिटॅमिन ए, बी ३, सी आणि ई मुबलक असते. ज्याचा परिणाम तुमच्या केसांच्या मुळांवर होतो. केसांच्या मुळांचे योग्य पोषण झाल्यामुळे तुमच्या केसांची योग्य वाढ होते. जर तुम्हाला लांबसडक आणि निरोगी केस हवे असतील तर केसांच्या मुळांना तेलासोबत दररोज गुलाबपाणी जरूर लावा. शिवाय सणासुदीला सुंदर केस हवे असतील तर गुलाब पाकळ्यांचा वापर करून असं वाढवा तुमच्या केसांचं सौंदर्य गुलाब पाकळ्यांचा वापर करून तयार करा हेअरमास्क आणि हेअरऑईल

**केसांचा निस्तेजपणा कमी करण्यासाठी**

गुलाब पाकळ्यांमधील पोषक तत्त्व तुमच्या केसांच्या आरोग्यासाठी अतिशय पोषक असतात. ज्यामुळे तुमच्या केसांचा निस्तेजपणा कमी होऊ शकतो.

**कसं तयार कराल हेअर ऑईल**

जोजोबा ऑईलमध्ये गुलाबाच्या पाकळ्या मिसळा. तेल थोडं कोमट करा आणि या तेलाने केसांच्या मुळांना दहा मिनीटं मस्त मसाज करा. वीस मिनीटांनी केस स्वच्छ धुवून टाका. दोन ते तीन दिवसांनी हा मसाज केला तर एका महिन्यात तुमच्या केसांचा निस्तेजपणा कमी होईल.

**केसांमधील कोंडा कमी करण्यासाठी**

हवामानात झालेला बदल अथवा कोरड्या त्वचेमुळे केसांमध्ये कोंडा निर्माण होतो. अशा वेळी सतत अ‍ॅटि डॅन्ड्रफ शॅम्पूचा मारा झाल्यास केसांचे नुकसान होऊ शकते. कोंड्यावर नैसर्गिक उपाय केल्यास नक्कीच चांगला फायदा होऊ शकतो.

**कसा तयार कराल हेअरपॅक**

अर्धा कप मेथीचे दाणे, चार पाच गुलाबाच्या पाकळ्या दोन ते तीन कप गुलाबपाण्यामध्ये चार तास भिजत ठेवा. त्यानंतर त्याची एक जाडसर पेस्ट करून ती केसांना एखाद्या हेअरपॅकप्रमाणे केसांवर लावा. अर्धा तासाने केस स्वच्छ करा. हा उपाय महिन्यातून एकदा केल्यास तुमच्या केसांमधील कोंडा कमी होईल आणि केसांचे आरोग्य वाढेल

**नैसर्गिक ग्लो येण्यासाठी**

तुमचे केस फ्रिझी अथवा कोरडे असतील त्यांना मॅनेज करण्यासाठी तुम्ही गुलाबपाणी वापरू शकता.गुलाबपाण्यामुळे तुमचे केस मऊ आणि मुलायम होतात. शिवाय त्यांच्यावर एक नैसर्गिक चमक दिसू लागते.

**कसा तयार कराल हेअरपॅक**

एका कोरफडीचा गर घ्या त्यामध्ये गुलाबाच्या पाकळ्या अथवा गुलाब पावडर मिसळून एक हेअरपॅक तयार करा. या मिश्रणाची पेस्ट तुम्ही मिक्सरचा वापर करून तयार करू शकता. हा हेअर पॅक केसांना लावून तुम्ही अर्धा तासाने तुमचे केस धुवू शकता. आठवड्यातून एकदा हा उपाय केल्यास तुमचे केस मऊ आणि चमकदार दिसू लागतील.

**केसांचा तेलकटपणा कमी करण्यासाठी**

जर तुमच्या केसांमधील त्वचा तेलकट असेल तर तुमचे केस तेलकट आणि चिकट होतात. अशा केसांवर धुळ आणि माती पटकन चिकटते. ज्यामुळे मग केस लवकर खराब होऊ शकतात. केसांच्या मुळांमधील हे अतिरिक्त तेल कमी करण्यासाठी तुम्ही गुलाबपाण्याने केसांना मसाज करू शकता.

**कसं तयार कराल हेअर ऑईल**


यासाठी गुलाबपाण्यात थोडंसं ऑलिव्ह ऑईल मिसळून त्याने केसांना हळूवार हाताने मसाज करा. नियमित केलेल्या या उपायाने तुमचे केस मऊ आणि मुलायम दिसू लागतील.



# खूप प्रयत्न करूनही येत नाही शांत झोप



व्यायाम करणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशी ठरते. यामुळे आपलं शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत होते. परंतु तुम्हाला माहीत आहे का? व्यायामाचा संबंध फक्त आपल्या शारीरिक आरोग्यावर नाही तर झोपेसोबतही असतो. असं आम्ही सांगत नसून काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या संशोधनातून असं सिद्ध झाले आहे. एका नव्या संशोधनातून असा दाव करण्यात आला आहे की, जे तरूण फिजिकली अ‍ॅक्टिव्हिटीमध्ये सहभागी असतात. ते एक्सरसाइज न करणाऱ्यांच्या तुलनेत जास्त वेळ आणि उत्तम पद्धतीने झोप घेतात.



**एक्सरसाइज केल्याने रात्री १० मिनिटं जास्त झोपतात**

सायन्टिफिक रिपोर्ट्स नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या या संशोधनामध्ये संशोधनकर्त्यांना असं आढळून आलं की, अशा तरूण व्यक्ती ज्या प्रत्येक तासाला काही जास्त परिश्रमाची कामं करतात, ते रात्री १८ मिनिटं लवकर, १० मिनिटं जास्त आणि एक टक्के शांत झोप घेतात. पेन स्टेटच्या डेटा साइंटिस्ट लिंडसे मास्टर म्हणतात की, 'शांत झोप येणं हे तरूणपणी अत्यंत अवघड असतं. कारण या दरम्यान झोप क्लासरूम परफॉर्मन्स, स्ट्रेस आणि इटिंग बिहेवियरमुळे डिस्टर्ब असते. याच गोष्टींवर हा रिसर्च लक्ष केंद्रित करतो. जर तरूण मुलांना प्रत्येक दिवशी जास्त एक्सरसाइज करण्यासाठी प्रोत्साहित केलं गलं तर रात्री त्यांना शांत झोप मिळण्यासाठी मदत होते.

**दिवसभरात आळस केल्याने रात्री झोप येत नाही**

संशोधनातून सिद्ध झालेले सर्व निष्कर्ष दिवसभरात जर तरूण निष्क्रीय राहत असतीस तर रात्री त्यांना शांत झोप लागत नाही. संशोधनमध्ये सहभागी झालेले प्रतिस्पर्धी जेव्ह दिवसभरामध्ये जास्त वेळेसाठी निष्क्रिय असतात. ते रात्रीच्या वेळी लवकर जोपतात आणि सकाळी उशीरा उठतात. पण त्यांची झोप पूर्ण होत नाही. म्हणजेच फिजिकल अ‍ॅक्टिव्हीटी आणि झोपेमध्ये संबंध असल्याचे स्पष्ट होते.



**वयाच्या १५ व्या वर्षी ४१७ लोकांना सहभागी करण्यात आलं होतं**

संशोधनासाठी संशोधकांनी ४१७ लोकांना सहभागी केलं होतं. जेव्हा या व्यक्ती १५ वर्षांच्या होत्या, त्यावेळी त्यांना एक्सीलेरोमीटर्स देण्यात आले होते. जे त्यांच्या मनगटावर आणि हिप्सवर बांधण्यात आले होते. जे एक आठवड्यापर्यंत त्यांची फिजिकल अ‍ॅक्टिव्हीटी आणि झोप यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम करत होते. या संशोधनाचा उद्देश हाच होता की, सहभागी झालेल्या लोकांकडून त्यांच्या वागणूकीबाबत विचारण्याऐवजी त्यांच्या शारीरिक हालचालिंब आणि झोपेवर लक्ष ठेवणे.

**टिप :** वरील सर्व गोष्टी संशोधनातून सिद्ध झालेल्या असून आम्ही केवळ माहिती म्हणून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत. यातून आम्ही कोणताही दावा करत नाही. त्यामुळे कोणताही उपाय करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घेणे

# नेहमी वाईट नसतं वाढतं वय, असतात काही खास फायदेही !



वाढदिवसाला अनेकजण गमतीने म्हणतात की, आयुष्यातील एक वर्ष कमी झालं. मित्रही गमतीने 'अरे म्हातारा होतोय तू' अशा कमेंट करू लागतात. अनेकांना असा अनुभव आला असेल. सामान्यपणे आपण बघतो की, वाढत्या वयामुळे अनेकजण निराश होऊ लागतात. कारण वाढत्या वयाकडे लोक म्हातारणाशी जोडून बघतात. त्यामुळे कुणी जर वय विचारलं तर अनेकजण वय लपवण्याचा प्रयत्न करतात. पण मुळात वय वाढणं तुमच्या आरोग्यासाठीच नाही तर सौंदयार्साठीही फार फायदेशीर असतं. तज्ज्ञांनुसार तर याचा संबंध मेंदूच्या क्षमतेशी सुद्धा असतो.

**आत्मविश्वास वाढतो :** वाढत्या वयासोबतच अनेक गोष्टी इम्प्रूव्ह होतात. त्यातील एक मुख्य गोष्ट म्हणजे आत्मविश्वास वाढणे. अनेकांना कमी वयात वेगवेगळ्या गोष्टी करण्यात अडचणी, भीती वाटत असते, अनेकांना स्टेजवर जाण्याची भीती वाटत होती, तर कुणाला इंटरव्ह्यूचं टेन्शन आलं असेल. पण जसजसं वय वाढत जातं, तुमचा आत्मविश्वास वाढत जातो.

**सौंदर्य सुद्धा खुलतं :** जसजसं वय वाढत जातं त्याचा सर्वात जास्त प्रभाव त्वचेवर पडतो. वय वाढत असताना त्वचेवरील ऑईल दूर होत जासं आणि त्वचा ड्राय व चांगली होऊ लागते. वयानुसार, सेबेससियस ग्लॅंडमधून ऑइलचा स्त्राव कमी होतो. ज्यामुळे वाढत्या वयासोबत ऑइली त्वचेची समस्याही दूर होते.

**स्मरणशक्ती :** जास्तीत जास्त लोकांची अशी धारणा असते की, वयानुसार मेंदूची क्षमता कमी होऊ लागते. पण इश्यू ऑफ सायकॉलॉजिकल सायन्सच्या एप्रिल २०१५ च्या रिसर्चनुसार, आपल्या कॉग्नीटिव्ह स्कील, ज्यात नाव, नवीन शब्द, माहिती लक्षात ठेवणे या क्षमता वयानुसार वाढत जाते. अभ्यासकांनुसार, विसरण्याची समस्या साठ वर्षांनंतर सुरू होते. हा रिसर्च ५० हजार लोकांच्या आयक्यू आणि मेमरी टेस्टवर केला होता. ज्यात लहान मुले, तरूण आणि वयोवृद्धांचा समावेश होता.

**मायग्रेन होतो दूर :** वाढत्या वयासोबत मायग्रेनची समस्या ठीक होऊ लागते. यूनायटेड किंगडमच्या मायग्रेन ट्रस्टच्या मायग्रेन रिसर्च चॅरिटीनुसार, सर्वच केसेसमध्ये असं होत नाही, पण ४० टक्के लोकांचं असं मत आहे की, त्यांच्या वाढत्या वयासोबत त्यांची समस्या दूर झाली.

**कमी झोप येणे :** वय वाढण्याचा सर्वात मोठा फायदा हा असतो की, तुमच्याकडे काम करण्यासाठी जास्त वेळ असतो. कारण वय वाढण्यासोबत झोप कमी येते. खासकरून एका वयानंतर

# झोपण्याआधी प्या यूजफूल ड्रिंक... जिम न जाता पोटाची चर्बी होईल कमी



दिवसेंदिवस लठ्ठपणाच्या समस्या वाढतच चालल्या आहे. अनेक उपाय करूनही लोकांच वजन कमी होत नाही. तेव्हा तुम्ही या ड्रिंक ट्राय करायला हरकत नाही. त्याचे चांगेल रिजल्टही तुम्हाला बघायला मिळतील. तुमच्या रात्रीच्या आहारावर तुमचं वजन किती वाढू शकतं हे अवलंबून असतं. तेव्हा रात्री झोपण्यापूर्वी या दोन ड्रिंक ट्राय करण्याचे फायदे जाणून घ्या.

**हळदीचं दूध :** हळदीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे औषधी गुणधर्म आहेत.हळदीमध्ये प्रत्येक प्रकारचे न्यूट्रियंट्स असता. त्यामुळे वजन कमी करण्यास हळदीचं दूध फायदेशीर ठरते. झोपण्यापूर्वी या हळदीचं दूध पिल्यास चांगले रिजल्ट मिळतात.

**मेथीचा चहा :** जर तुम्हाला तुमच्या पोटाची चर्बी कमी करायची असेल तर आजच मेथीचा चहा प्यायला सुरूवात करा. हिवाळ्यात जास्त जेवण जेवल्याने तुमची पचनशक्ती बिघडते. मेथीचा चहा तुमची पचनशक्ती सुधारते. याला बनवण्यासाठी एक ग्लास पाणी घ्या त्यात एक चम्मच मेथी टाका. सकाळच्या वेळी हे पाणी गाळून घ्या आणि रात्री हलक गरम करून प्या. याचे तुम्हाला चांगले रिजल्ट्स मिळतील.

**या कारणाने वाढतं वजन :** रात्री निदान झोपण्याच्या दोन तासाआधी जेवायला हवं. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. जेवन करून लगेच झोपणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. त्यामुळे वजन वाढू नये यासाठी झोपण्याच्या दोन तासापूर्वी जेवण करणे गरजेचे आहे.



# पुण्यात नाही तर विरारमध्ये तयार होणार

## महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमाकांचे सर्वात मोठे विमानतळ

**विरारमध्ये नेमकं कुठे बनणार विमानतळ?**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नालासोपारा येथील जाहीर सभेत विरारमध्ये विमानतळ उभारण्याची घोषणा केली. राज्य सरकार विरार आणि पालघर या दोन्ही ठिकाणांचा सखोल अभ्यास करणार आहे. यानंतर कोणती जागा अधिक सोयीस्कर आणि दीर्घकालीन दृष्टीने फायदेशीर ठरेल याचा विचार करुन जागेचा निर्णय घेतला जाणार आहे. अंतिम निर्णयापूर्वी तज्ज्ञांकडून अभिप्राय मागवण्यात आला आहे ह्वविरारमध्ये विमानतळ उभारण्यात आल्यास तो कोस्टल रोडमार्गे प्रस्तावित वाढवण बंदराशी थेट जोडता येईल, त्यामुळे कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ होईल. तर पालघरची निवड झाल्यास वसई-विरार, विमानतळ आणि बंदर यांच्यातील वाहतूक सुविधा अधिक सक्षम करण्यात येतील असे मुख्यमंत्री म्हणाले.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमाकांचे सर्वात मोठे नवी मुंबई विमानतळ अखेर प्रवाशांच्या सेवेत दाखल झाले आहे. मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबई विमानतळ उभारण्यात आले आहे. नवी मुंबई विमानतळावरुन विमानांचे उड्डाण सुरु झाले आहे. यामुळे मुंबई विनातळावरील ताण कमी होणार आहे. अशातच महाराष्ट्रातील तिसरे मोठे विमानतळ पुण्यात उभारणार अशी चर्चा आहे. मात्र, महाराष्ट्रातील तिसरे मोठे विमानतळ पुण्यात नाही तर विरारमध्ये सुरु होण्याची शक्यता आहे. हे भारतातील पहिले समुद्रावर तरंगणारे विमान आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात उभारण्यात येत असलेल्या तिसऱ्या विमानतळाबाबत मोठी अपडेट दिली आहे. महाराष्ट्रातील तिसरे मोठे विमानतळ समुदावर तरंगणारे विमानतळ असणार आहे. हे भारतातील पहिले समुद्रावर तरंगणारे विमानतळ आहे. हे विमानतळ विरारजवळ उभारण्यात येत आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई विमानतळानंतर महाराष्ट्रात तिसरे मोठे विमानतळ उभारण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे. नवी मुंबई विमानतळाला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता भविष्यातील प्रवासीभार लक्षात घेऊन हा निर्णय घेतला जात आहे. याआधी तिसरे विमानतळ पालघरमध्ये उभारण्याचा विचार होता, मात्र आता विरारसह नव्या पयार्यांची पाहणी सुरू करण्यात आली आहे.

**वसई-विरार परिसरात मोठे विकास प्रकल्प**

पालघरजवळ 'तिसऱ्या मुंबईची परिसंस्था' उभारण्याचे उद्दिष्ट असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंजुरी दिलेल्या या प्रकल्पाला गती देण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. पालघर आणि वसई-विरार परिसरात बंदर, विमानतळ आणि बुलेट ट्रेनसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. तिसऱ्या मुंबईच्या निमीर्तीच्या अनुषंगाने वसई-विरार परिसरात मोठे विकास प्रकल्प उबारले जात आहेत.

### धान्य निविदा प्रक्रिया रखडवणाऱ्यांना नोटीस बजावणार

# अन्न व नागरी पुरवठा विभागाचा इशारा

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील गोरगरीब जनतेपर्यंत स्वस्तात धान्य पुरवठा करण्यासाठी तातडीने धान्य वाहतूक निविदा प्रक्रिया राबवा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मात्र मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला बगल देत संबंधित कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांनी राज्यातील २९ जिल्ह्यातील धान्य निविदा प्रक्रिया रखडवल्याचे समोर आले आहे. हा प्रस्ताव वित्त विभागाच्या मंजुरीसाठी प्रलंबित आहे. या विलंबाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल आणि त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल, असा इशारा अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिला आहे.

मुख्यमंत्र्यांचे आदेश धुडकावून लावून जुन्या कंत्राटदारांना पोसण्याचे धाडस काही अधिकाऱ्यांनी केल्याने मंत्रालयात खळबळ उडाली आहे. सरकारी तिजोरीला कोट्यवधींचा फटका बसत असताना, काहींचे खिसे मात्र भरत असल्याचे चित्र आहे.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, अकोला, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर, हिंगोली, चंद्रपूर, जळगाव, बुलढाणा, यवतमाळ, जालना, सातारा, कोल्हापूर आणि परभणी या २० जिल्ह्यांमध्ये रेशन दुकानांपर्यंत धान्य पोहोचवण्यासाठी १५ जानेवारी २०२१ रोजी निविदा काढण्यात आल्या होत्या.


**अधिकाऱ्यांची मनमानी!**
हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गेल्यावर त्यांनी कंत्राटदारांना सरसकट वर्षभराची मुदतवाढ देण्यास स्पष्ट नकार दिला होता. पुढील सहा महिन्यांत नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण करा. विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करा, असे स्पष्ट लेखी निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. मात्र अन्न पुरवठा विभागाने लेखी आदेशाला जुमानले नसल्याचे समोर आले आहे. मुदत संपून वर्ष उलटले तरी नवीन निविदा न काढता जुन्याच कंत्राटदारांचे कंत्राट प्रत्यक्षात सुरूच ठेवण्यात आले आहे.

# गोरेगाव (प.)मध्ये फ्रीजच्या स्फोटामुळे आग... वडिलांसह दोन मुलांचा मृत्यू

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

गोरेगाव (प.) भगतसिंग नगर येथील एका घरात शनिवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास फ्रीजचा स्फोट झाल्यानंतर आग लागली. यावेळी गाढ झोपेत असलेल्या पावसकर कुटुंबातील संजोग पावसकर यांच्यासह हर्षदा पावसकर आणि कुशल पावसकर या दोन मुलांचा दुदैवी अंत झाला. रात्रीच्या वेळी आई कामावर गेल्यामुळे बचावली, मात्र सकाळी घरी परतल्यावर उरला होता तो फक्त राख झालेला संसार आणि आपल्या माणसांचे मृतदेह.

गोरेगाव (प.) येथील भगतसिंग नगर परिसरात राहणारे पावसकर कुटुंब झोपले होते. पहाटे ३ च्या सुमारास



**आईच्या जगण्याची उमेद हरपली!**
पावसकर यांची पत्नी रात्रपाळी असल्यामुळे कामावर गेल्याने या दुर्घटनेतून बचावली. सकाळी घरी परतल्यानंतर तिला हे भीषण वास्तव समोर दिसले. एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. पती आणि दोन्ही मुलांचा आधार हरपल्याने तिच्या जगण्याची उमेद हरपली.

अचानक घरातील फ्रीजचा भीषण स्फोट झाला. या स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की, परिसरातील नागरिक जागे झाले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले. पावसकर यांच्या कुटुंबाच्या घराला बाहेरून प्लास्टिक शीट लावली असल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. अवघ्या काही मिनिटांत आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण घराला वेढा घातला. आग लागल्यानंतर जीव वाचवण्यासाठी मुलांनी आटोकाट प्रयत्न केले. अवघ्या १२ वर्षांचा कुशल स्वतःचा जीव वाचवण्यासाठी बाथरूममध्ये जाऊन लपला होता. मात्र, प्लास्टिक जळाल्यामुळे निर्माण झालेला विषारी धूर आणि वाढलेली उष्णतेमुळे कुशलसह त्याचे वडील आणि बहिणीचा गुदमरून व होरपळून जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. फ्रीजचा स्फोट शॉर्टसर्किटमुळे झाला की अन्य काही तांत्रिक कारणाने, याचा तपास अग्निशमन दल आणि पोलीस करत आहेत.

# साखर कारखान्यांच्या गैरव्यवहाराची चौकशी होणार

## २१ कारखान्यांवर कारवाईची टांगती तलवार... राज्य सरकारकडून समिती स्थापन



**समिती दोन आठवड्यांत अहवाल सादर करणार!**
या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी साखर आयुक्त (पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. यात संबंधित प्रादेशिक सहसंचालक आणि साखर आयुक्त कार्यालयाचे संचालक (अर्थ) यांचा समावेश आहे. ही समिती पुढील दोन आठवड्यांत आपला अहवाल सरकारला सादर करणार आहे.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमने राज्य सरकारमार्फत वितरित केलेल्या कर्जाच्या विनियोगात गंभीर गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील ३२ सहकारी साखर कारखान्यांना खेळते भांडवल आणि 'मार्जिन मनी'ची गरज पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारमार्फत एकूण ४३५५.९२ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले होते. जून २०२५ मध्ये एनसीडीसीच्या अधिकाऱ्यांनी यापैकी ३० कारखान्यांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

या तपासणीत धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. त्यामध्ये कर्जाच्या वापरामध्ये गंभीर स्वरूपाचे उल्लंघन, केवळ सहा कारखान्यांनी अटी व शर्तीनुसार कजार्चा योग्य विनियोग आणि कर्जाच्या वापरामध्ये काही प्रमाणात अटींचे उल्लंघन आढळून आले. यामुळे या सर्व साखर कारखान्यांवर आता कोणत्या प्रकारची कारवाई केली जाणार आहे, हे सरकार ठरवणार आहे.

**मदतनिधी योगदानातून तात्पुरता दिलासा**

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना विविध मदत निधींमध्ये योगदान देण्याच्या राज्य सरकारच्या अटीपासून मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरता दिलासा दिला आहे. मुख्यमंत्री मदत निधी (सीएमआरएफ), गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ आणि राज्य पूर मदतनिधी यांना देय असलेल्या आकारणीला स्थगिती देत या योगदानांशिवायही क्रशिंग परवाने देण्यास मनाई करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# टाटा मुंबई मॅरेथॉनसाठी धावपटू सज्ज

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

आशियातील सर्वात मानाची आणि जगातील अव्वल मॅरेथॉनपैकी एक असलेली 'टाटा मुंबई मॅरेथॉन' यंदा २१ व्या वर्षात पदार्पण करत आहे. येत्या १८ जानेवारी रोजी होणाऱ्या या 'गोल्ड लेबल' रेसमध्ये यंदा जागतिक स्तरावरील अत्यंत वेगवान धावपटूंचा ताफा उतरणार आहे. विशेष म्हणजे, सहभागी होणाऱ्या ८ पुरुष आणि ६ महिला धावपटूंच्या वैयक्तिक सर्वोत्तम वेळा सध्याच्या स्पर्धा विक्रमांपेक्षा अधिक जलद असल्याने, यंदा मुंबईच्या रस्त्यांवर नवे विक्रम प्रस्थापित होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.सध्या पुरुष गटात इथिओपियाचा हायले लेमी बेरहानू आणि महिला गटात अँकिआलेम हायमॅनॉट यांच्या नावावर मुंबई मॅरेथॉनचे विक्रम आहेत. हे विक्रम मोडीत काढणाऱ्या धावपटूला ५० हजार डॉलर्सच्या मुख्य बक्षिसाव्यतिरिक्त अतिरिक्त १५,००० डॉलर्सचे बक्षीस दिले जाणार आहे. या भव्य पारितोषिकांमुळे स्पर्धेची चुरस अधिकच वाढली आहे. एरिट्रियाचा मेरहावी केसेते या शर्यतीचा मुख्य आकर्षण असेल. त्याच्यासोबत युगांडाचा विश्वविजेता व्हिक्टर किपलांगाट आणि दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी स्टीफन मोकाका हे विजेतेपदासाठी कडवी झुंज देतील. इथिओपियाचे बाजेझेव अस्मारे आणि ताडू डेमे हे देखील विजयाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

**कशोरी पेडणेकर यांच्या रॅलीत फटाक्यांमुळे...**
मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. जाहीर सभांसोबतच उमेदवार मतदारांच्या प्रत्यक्ष भेटींना जात आहेत. १० जानेवारीच्या सायंकाळी सुमारे साडेसहा वाजता एन. एम. जोशी मार्ग येथील गोवर्धन बिल्डिंगसमोर प्रभाग क्रमांक १९९ येथील शिवसेना (ठाकरे) उमेदवार माजी महापौर किशोरी पेडणेकर यांची प्रचार फेरी काढण्यात आली होती. रॅलीच्या आयोजनाची परवानगी आयोजक रामचंद्र कृष्णा येसादे यांना निर्धारित अटींसह देण्यात आली होती आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी एन. एम. जोशी मार्ग पोलीस स्टेशनचे पोलीस पथक घटनास्थळी तैनात होते.

# प्रचार रॅलीदरम्यानच्या फटाक्यांमुळे लोअर परेल भागात चाळ आणि बिल्डिंगला आग

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी शिवसेनेच्या (ठाकरे) उमेदवार माजी महापौर किशोरी किशोर पेडणेकर यांच्या प्रचार रॅलीदरम्यान करण्यात आलेल्या फटाक्यांच्या अतिषबाजीने मुंबईतील एक बिल्डिंग आणि चाळीतील घरांना आग लागली. या घटनेनंतर अग्निशमन दलाचे पथक, पोलीस घटनास्थळी दाखल झाले त्यांनी ही आग विझवली. ही घटना रविवारी रात्री घडली. निष्काळजीपणाने फोडलेल्या फटाक्यांमुळे गोवर्धन बिल्डिंग आणि इराणी चाळीतील काही खोल्यांना आग लागल्याच्या घटनेप्रकरणी रॅलीच्या आयोजकासह तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**फिटाक्यांची अतिषबाजी सुरु होती**

जेव्हा प्रचार रॅली गोवर्धन बिल्डिंगसमोर सार्वजनिक रस्त्यावर पोहोचली आणि उमेदवार गृहभेटी, मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीसाठी इमारतीत जात होत्या, त्याचवेळी काही कार्यकर्ते रस्त्यावर आकाशात उडणारे फटाके फोडताना



दिसले. ड्युटीवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांना सार्वजनिक ठिकाणी फटाके न फोडण्याची सक्त ताकीद दिली, तरीही फटाकेबाजी सुरूच राहिली. पोलिसांनी आयोजकांनाही हा प्रकार त्वरित थांबवण्याचे निर्देश दिले, परंतु या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

याच दरम्यान, फटाक्यांमधून उडणाऱ्या ठिणग्या गोवर्धन बिल्डिंगच्या पाचव्या मजल्यावरील घर क्रमांक ५०१ च्या खिडकीवरील पडद्यांवर पडल्या, ज्यामुळे आग भडकली. आग वेगाने पसरत जवळच्या इराणी चाळीतील खोली क्रमांक ११२, ११३, आणि ११४ पर्यंत पोहोचली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आणि घटनास्थळी दाखल झालेल्या चार अग्निशमन दलाच्या गाड्यांनी अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले. आगीच्या या घटनेत संबंधित घरांचे नुकसान झाले असले तरी, कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात समोर आले आहे की, फटाके फोडणाऱ्या दोन्ही कार्यकर्त्यांनी परवानगीच्या अटी आणि नियमांचे उल्लंघन केले. याप्रकरणी आयोजक रामचंद्र कृष्णा येसादे तसेच कार्यकर्ते सोहम रविंद्र सरवणकर (२१) आणि ओमसाई विक्रम पाणसरे (२१) यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# बीडमध्ये पोलीस दलातील कर्मचाऱ्याने तरुणीला लग्नाचं आमिष दाखवत केलं लैंगिक शोषण

■ **बीड। प्रतिनिधी,**

समाजाच्या रक्षणाची ज्यांच्या खांद्यावर जबाबदारी असते, अशाच एका पोलीस दलातील कर्मचाऱ्याने एका तरुणीचा विश्वासघात केल्याची धक्कादायक घटना घडली. लग्नाचे आमिष दाखवून एका २५ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचा माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार आता उघडकीस आला आहे. या प्रकरणी नराधम




काही दिवसांपूर्वी पीडितेनं लग्नासाठी पोलिसांकडे तगादा लावून धरला होता. तेव्हा आरोपीने लग्नास नकार दिला होता. पीडितेला आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच त्यांनी अंभोरा पोलीस ठाणे गाठलं आणि आपल्यासोबत घडलेला एकूण प्रकार सांगितला. पीडितेनं दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस कर्मचाऱ्याविरोधात अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनं संपूर्ण बीड हादरून गेलं आहे. या घटनेनं पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाल्याचं चित्र आता समोर आलं आहे.

**पोलीस दलातील सैनिकानं तरुणीशी जवळीकता साधली**

घडलेल्या घटनेनुसार, पीडित तरुणी आष्टी तालुक्यातील एका गावातील रहिवासी असल्याचं सांगण्यात येत आहे. आरोपी हा पीडितेच्या घरानजीकच राहतो. तो पीडितेला ओळखत होता, त्याचाच फायदा घेत त्यानं पीडितेशी जवळीकता साधली आणि तिला लग्नाचे आमिष दाखवले. पीडितेचा विश्वास संपादन केल्यानंतर त्याने तिला लग्नाचे आश्वासन दिले होते. पीडितेच्या आई-वडील घरी नसताना किंवा संधी मिळेल तेव्हा आरोपीने पीडितेच्या घरात जाऊन तिच्यावर अनेकदा संशय व्यक्त केला होता. तिने अनेकदा पीडितेचे लैंगिक शोषण केले होते. याच काळात पीडितेनं त्याला अनेकदा लग्नाविषयी विचारले असता, तेव्हा तो काहीबाही सांगून विषय टाळून द्यायचा.

### शौचासाठी रात्री घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

# व्हॅनमध्ये आढळली पीडिता, हादरवून टाकणारी घटना

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. गुजरातच्या वानसडा शहरातील एका गावात १५ वर्षाच्या मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचार झाला होता. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी कारवाईची चक्र फिरवत एकूण आठ आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींवर भारतीय संहिता आणि पोक्से अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पीडित मुलगी रात्री शौचास जाण्यास घराबाहेर पडली अन्...**

**घराबाहेर उभी असलेल्या फॅमिली व्हॅनमध्ये पीडिता आढळली**
यादरम्यान काही आरोपींनी पीडितेचे हात आणि पाय दाबले, यामुळे पीडितेला आवाज करता आला नाही. बुधवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास कुटुंब झोपले होते, अशातच वडील जागे झाले असता मुलगी अंथरुणावरच दिसत नव्हती. कुटुंबाने रात्रभर गावात आणि परिसरात तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. गुरुवारी सकाळी, पीडिता घराबाहेर उभी असलेल्या एका फॅमिली व्हॅनमध्ये आढळली होती, भीतीमुळे तिने दार ठोठावलं नव्हतं असं सांगण्यात येत आहे.

वृत्तमाध्यमाने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ७ जानेवारी रोजी घडल्याचं सांगण्यात येत आहे. पीडित मुलगी रात्री १०:३० वाजता शौचास जाण्यास घराबाहेर पडली होती. मोटारसायकलवरून तीन तरुण आले. हे तिघेही पुरुष पीडिता आणि तिच्या कुटुंबाला ओळखत होते, असे वृत्त आहे. आरोपींनी पीडितेचं जबरदस्तीने अपहरण केलं आणि तिला सुमारे २.५ ते ३ किमी अंतरावर दुसऱ्या गावात घेऊन गेले होते.

**पाण्याच्या टाकीजवळील खोलीत नेऊन केले अत्याचार**

आरोपींनी पीडितेचं अपहरण केलं आणि नंतर तिला पाण्याच्या टाकीजवळील एका खोलीत नेले. त्या ठिकाणी काही वेळापूर्वी एक कार घेऊन काही आरोपी वाट पाहत होते. आरोपीने पीडितेशी शरीरसंबंध ठेवण्याची मागणी केली होती. तसेच किशोरीने प्रतिकार केल्यानंतर तिला मारहाण केली. त्या आठही जणांनी आळीपाळीने लैंगिक अत्याचार केल्याचं सांगण्यात येत आहे.

पीडितेच्या पालकांनी तिला विचारपूस केली असता, तिने आपल्यासोबत घडलेला सर्व प्रकार सांगितला. या प्रकरणी पोलीस उपअधीक्षक बी.व्ही. गोहिल म्हणाले की, गुरुवारी तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली होती. अटक करण्यात आलेल्यांपैकी आठ जणांपैकी सात जण २० ते २१ वर्षांच्या दरम्यान आहेत, तर एक अल्पवयीन आहे. न्यायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# आधी तरुणीला नाचवलं, नंतर ६ जणांनी मिळून आळीपाळीने केला बलात्कार! उपसरपंचाच्या पतीला अटक

पीडितेने पोलिसांकडे तक्रार करताना सांगितलं की, शनिवारी संध्याकाळच्या सुमारास ती तिच्या घरी जात होती. दरम्यान, वाटेत एक कार तिच्याजवळ येऊन थांबली आणि त्यातील काही लोकांनी तिला बळजबरीने उचलून गाडीत बसवलं. त्यावेळी, आरोपींनी पीडितेला मारहाण केली आणि डगरुआ बॅरिअरजवळ असलेल्या एका खोलीत घेऊन गेले. तिथे पोहोचल्यानंतर, आधी तरुणीला जबरदस्तीने नाचण्यास भाग पाडण्यात आलं आणि ६ जणांनी आळीपाळीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. नंतर, त्यातील पाच आरोपी खोलीच्या बाहेर गेले आणि खोलीला आतून कुलूप लावलं. त्यावेळी, एक आरोपी तिच्यासोबत त्या रूममध्ये होता. दरम्यान, तरुणीने संधी साधून त्या आरोपीच्या मोबाईल फोनवरून ११२ नंबर डायल केला आणि पोलिसांना फोन लावला.

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

एका तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याचं धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. संबंधित घटना ही शनिवारी (१० जानेवारी) रात्री बिहारच्या पुर्णिया येथील डगरुआ पोलीस स्टेशन हद्दीत घडली. पोलीस ठाण्याच्या केवळ ३ किमी अंतरावर असलेल्या एका खोलीत पीडितेसोबत ६ जणांनी घृणास्पद कृत्य केलं. पीडित तरुणीने पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे ६ आरोपी तरुणांविरुद्ध मारहाण आणि सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**उपसरपंचाच्या पतीला घेतलं ताब्यात...**

संबंधित घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले. त्यावेळी, खोलीला बाहेरून कुलूप लावल्याचं दिसून आलं. त्यानंतर, कुलूप तोडून खोलीत प्रवेश केला असता आत पीडितेसोबत डगरुआ गावाच्या उपसरपंचाचा पती जुनैद आलम आढळून आला. पोलिसांनी आरोपी जुनैदला घटनास्थळावरून ताब्यात घेतलं आणि पीडितेला मोडिकल तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आलं.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा आरोपींविरुद्ध पीडितेला मारहाण केल्याप्रकरणी आणि तिच्यासोबत घृणास्पद कृत्य केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आल असून आरोपी जुनैद आलमला अटक करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित पाच आरोपींचा शोध घेण्यासाठी छापे टाकले जात आहेत. लवकरच, सर्व आरोपींना अटक केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com